सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ९५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. ५ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## भारताने रोखले चिनाबचे पाणी, लवकरच झेलमचेही थांबवणार

### पाकिस्तानच्या तोंडाला आणणार फेस : पाकच्या पंजाब प्रांताची जीवन रेखा कोरडीठाक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ नवी दिल्ली**

जम्मू-काश्मीरच्या पहलगाममधील पर्यटकांवरील भ्याड दहशतवादी हल्ल्याशी पाकिस्तानचा संबंध असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर भारताने पाकिस्तानविरुद्ध आणखी एक मोठी कारवाई केली आहे. सिंधू जल करार स्थगित केल्यानंतर भारताने आता पाकिस्तानला जाणारे चिनाब नदीचे पाणी रोखले आहे. इतकेच नव्हे, तर भारत आता काश्मिरातील किशनगंगा धरणातून पाकिस्तानला जाणारे झेलम नदीचे पाणी रोखण्याचीही तयारी सुरू केली आहे, असे सूत्रांनी सांगितले. यामुळे पाकमध्ये पाण्याचे मोठे संकट उद्भवू शकते.

चिनाब नदीवर बांधण्यात आलेल्या बगलिहार धरणातून पाकिस्तानला जाणारे पाणी रविवारी रोखण्यात आले. यामुळे पाकिस्तानला जाणाऱ्या चिनाबचे पात्र कोरडे पडले आहे. चिनाब नदी ही पाकिस्तानच्या पंजाब प्रांताची जीवन रेखा समजली जाते. पंजाब प्रांतातील शेती याच नदीच्या पाण्यावर अवलंबून असून, पिण्याच्या पाण्यासाठीही चिनाबवरच अवलंबून राहावे लागते. भारताने पाणी रोखल्यामुळे पाकिस्तानची अर्थव्यवस्था संकटात सापडण्याची शक्यता आहे.



भारत व पाकिस्तान यांच्यात बगलिहार धरणावरून प्रदीर्घ काळापासून वाद सुरू आहे. या वादात जागतिक बँकेने मध्यस्थी करावी, अशी मागणी पाकिस्तानने केली होती. चिनाबचे पाणी रोखल्यानंतर आता काश्मिरातील किशनगंगा धरणामार्फत झेलम नदीचे पाणी थांबवण्याची योजना भारताने तयार केली आहे.

सिंधू जल करारानुसार पाकिस्तानला पश्चिमेकडील सिंधू, चिनाब आणि झेलम या नद्यांवर नियंत्रण देण्यात आले आहे. पाकिस्तान सिंधू नदी प्रणालीतील सुमारे ९३ टक्के पाणी सिंचन आणि वीज निर्मितीसाठी वापरतो. पाकची ८० टक्के शेती या पाण्यावर अवलंबून आहे.

भारत जम्मूच्या रामबनमधील बगलिहार आणि उत्तर काश्मीरमधील किशनगंगा जलविद्युत धरणांमधून आपल्या बाजूने पाणी कधी सोडायचे आणि कधी रोखायचे याचे वेळापत्रक ठरवू शकतो. याचा दुसरा अर्थ असा आहे की, या धरणांमधून पाकिस्तानला पोहोचणारे पाणी कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय भारत बंद करू शकतो.

**दोन पाकिस्तानी हेरांना अटक**

पंजाबच्या अमृतसर पोलिसांनी रविवारी दोन हेरांना अटक केली. पोलिसांनी सांगितले की दोघेही परदेशात लष्करी छावण्या आणि हवाई दलाच्या तळांची माहिती आणि छायाचित्रे पाठवत होते. हे दोघेही पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयचे कार्यकर्ते आहेत.

**वाकड्या नजरेने बघणाऱ्यांना उत्तर**

दिल्लीतील भारत मंडपम येथे सनातन संस्कृती जागरण महोत्सवाला संबोधित करताना संरक्षणमंत्री राजनाथ सिंह रविवारी म्हणाले की, संरक्षणमंत्री म्हणून माझी जबाबदारी सुरक्षा दलांसोबत काम करणे आणि भारताकडे वाकड्या नजरेने बघणाऱ्या चोख उत्तर देणे हे आहे.

## विदर्भातील सिंचन अनुशेष जून-२०२७ पर्यंत संपणार

### मुख्य सचिव सुजाता सौनिक यांचे हायकोर्टात प्रतिज्ञापत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ नागपूर:**

राज्य सरकारने सिंचन अनुशेष भरून काढावा, याकरिता विदर्भदीर्घ काळापासून संघर्ष करीत आहे. ही प्रतीक्षा जून-२०२७ ला संपेल, अशी माहिती राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाला दिली आहे. त्यांनी यासंदर्भात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

सध्या विदर्भामध्ये केवळ अकोला व बुलडाणा हे दोनच सिंचन अनुशेषग्रस्त जिल्हे आहेत. अकोला जिल्ह्यातील २५ हजार १८५ हेक्टरपैकी १० हजार ६५५ हेक्टर जून-२०२५ पर्यंत व १४ हजार ५३० हेक्टर जून-२०२६ पर्यंत तर, बुलडाणा जिल्ह्यातील ३० हजार १३५ हेक्टरपैकी ८६७ हेक्टर जून-२०२५ पर्यंत, १९ हजार ८६४ हेक्टर जून-२०२६ पर्यंत तर, उर्वरित ९ हजार ४०४ हेक्टरचा अनुशेष जून-२०२७ पर्यंत भरून काढला जाईल, असे सौनिक यांनी न्यायालयाला सांगितले आहे. यासंदर्भात लोकनायक बापूजी अणे स्मारक समितीची जनहित याचिका उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यात न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, सौनिक यांनी हे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

राज्य सरकारने विदर्भाकरिता मंजूर केलेले १२७ सिंचन प्रकल्प वनक्षेत्र बाधित असून, आतापर्यंत त्यापैकी केवळ ४६ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. पर्यावरण परवानगीतील अडथळे, पुनर्वसन समस्या, स्थानिक नागरिकांचा विरोध इत्यादी कारणांमुळे १७ प्रकल्प रद्द करण्यात आले आहेत.

## काश्मीरच्या पूंछमध्ये जेवणाच्या डब्यात आढळली स्फोटकं, लष्करानं उद्ध्वस्त केला दहशतवाद्यांचा तळ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५जम्मू**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय लष्कर व तपास यंत्रणांनी जम्मू-काश्मीरमध्ये व्यापक शोधमोहीम सुरू केली आहे. दहशतवाद्यांच्या लपण्याच्या जागा व छुपे तळ शोधून काढण्यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली असून काही ठिकाणी लष्कराची थेट दहशतवाद्यांशीही चकमक होत असल्याचं समोर आलं आहे. अशाच एका मोहिमेमध्ये भारतीय सुरक्षा दलांनी जम्मू-काश्मीरमधील पूंछ जिल्ह्यातल्या दहशतवाद्यांच्या एका तळावर हल्ला चढवला. या हल्ल्यात हा तळ उद्ध्वस्त झाला असून तिथून मोठ्या प्रमाणावर स्फोटकं जप्त करण्यात आली आहेत.

इंडियन एक्स्प्रेसनं प्रशासनाच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, लष्कर व विशेष कृती दलाने संयुक्तपणे जम्मू-काश्मीरमध्ये ही शोधमोहीम राबवली आहे. या शोधमोहिमेदरम्यान सुरनकोट परिसरातील जंगलात दहशतवाद्यांच्या तळ असल्याची माहिती तपास पथकांना मिळाली. त्यानुसार, तातडीने या भागात सुरक्षा दल दाखल झालं. सूरनकोट परिसरात दहशतवाद्यांचा एक तळ सापडला असून तिथे चक्क जेवणाच्या डब्यात स्फोटकं लपवून ठेवण्यात आली होती, अशी माहिती समोर आली आहे.

**दहशतवाद्यांच्या तळावर काय सापडलं?**

लष्करी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या तळावर स्फोटकं उडवण्यासाठीच्या यंत्रणेचे पाच सेट आणि दोन वायरलेस सिस्टीम आढळून आल्या. त्याशिवाय, मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा आणि इतर यंत्रसामग्रीही लष्करानं ताब्यात घेतली आहे. या तळावर सापडलेल्या पाच आयईडीमध्ये अर्धा किलो ते ५ किलोपर्यंत स्फोटकं सापडली. ही स्फोटकं त्याच ठिकाणी नष्ट करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.


या पाच आयईडींपैकी दोन आयईडी दोन स्टीलच्या बादल्यांमध्ये ठेवले होते, तर तीन आयईडी चक्क जेवणाच्या डब्यात ठेवल्याचं आढळून आलं. याशिवाय युरियाची पाच पाकिटं, एक पाच लिटरचा गॅस सिलेंडर, एक दुर्बिण, तीन लोकरी टोप्या, तीन ब्लँकेट, काही पँट असं साहित्यही इथे आढळून आलं.

## आम्हाला वाचवा...भारताच्या मित्र अमेरिका-रशिया राष्ट्रांसमोर पाकने पसरले हात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५लाहोर**

पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव शिगेला पोहोचला आहे. भारतीय हवाई दल, लष्कर आणि नौदलाच्या युद्धाभ्यासांमुळे पाकिस्तानी लष्कर आणि सरकारची झोप उडाली आहे. भारताच्या लष्करी तयारीला घाबरलेला पाकिस्तान विविध देशांकडे मदतीची याचना करत आहे. भारताने हल्ला करू नये, असे समजून सांगण्याचे आवाहन पाकिस्तान भारताच्या मित्रराष्ट्रांकडे करत आहे. तुर्की-इराण आणि अमेरिकेनंतर पाकिस्ताननेही रशियाकडेही मदत मागितली आहे. अमेरिकेने तर पाकिस्तानला आधीच झिडकारले आहे.

दरम्यान, रशियातील पाकिस्तानी राजदूत खालिद जमाली यांनी पुतिन सरकारकडे मदतीचे आवाहन केले आहे. जमाली म्हणाले की, रशिया हा भारताचा धोरणात्मक भागीदार



आहे आणि पाकिस्तानचा मित्रही आहे. अशा परिस्थितीत, रशियाने तणाव कमी करण्यासाठी मध्यस्थी करावी. १९६६ च्या ताश्कंद करारात रशियाने अशीच मदत केली होती. त्यानंतर तत्कालीन सोव्हिएत युनियनने लष्करी संघर्ष संपवण्यास मदत केली, अशी आठवण जमालीने रशियाला करुन दिली. पण, रशियाकडून पाकिस्तानला कुठलीही मदत मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.भारताच्या जवळ असलेल्या इराणकडूनही पाकिस्तानला मदतीची अपेक्षा आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अरकची इस्लामाबादला पोहोचले आहेत. तेथून ते नवी दिल्लीलाही भेट देणार आहेत. अशा स्थितीत पाकिस्तानने त्यांच्याकडेही भारताला समजावून सांगण्याचे आवाहन केले आहे.एकीकडे पाकिस्तान शांततेचे आवाहन करत आहे आणि दुसरीकडे जगभरातील शक्तिशाली देशांकडे मदत मागत आहे. दारुगोळा आणि शस्त्रास्त्रांचा तुटवडा लक्षात घेता, पाकिस्तान तुर्कीसारख्या देशांकडूनही लष्करी मदत घेत आहे. तुर्कीची युद्धनौकाही कराचीत पोहोचली आहे.

## परीक्षेत नापास, आयुष्यात पास! दहावीत मुलगा फेल झाला तरी पालकांनी कापला केक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ बागलकोट**

कर्नाटक बोर्डाचा दहावीचा निकाल नुकताच जाहीर झाला. याच दरम्यान कर्नाटकातील बागलकोट जिल्ह्यातील एक अनोख उदाहरण समोर आलं आहे, जे केवळ पालकांच्या विचारसरणीत बदल घडवू शकत नाही तर अपयशाचा सामना करणाऱ्या विद्यार्थ्यांना एक नवीन दिशा देखील देऊ शकतं. परीक्षेत कमी गुण मिळाल्यानंतर, विद्यार्थ्याला कुटुंब, नातेवाईक, समाज आणि शाळेतील लोकांकडून टोमणे ऐकावे लागतात. ज्यामुळे विद्यार्थी अनेकदा




निराश होतात आणि डिप्रेशनमध्ये जातात असं अनेकदा दिसून येतं.

समाजात असं वातावरण निर्माण झालं आहे की, दहावी किंवा बारावीचे निकाल त्यांच्या भविष्याचा पाया ठरवू शकतात, जे बरोबर आणि चूक दोन्हीही असू शकतं. या परिस्थितीत, पालकांनी हे समजून घेतले पाहिजे की कमी गुण मिळालेल्या किंवा नापास झालेल्या मुलांशी त्यांनी सामान्यपणे वागलं पाहिजे आणि त्यांच्यावर दबाव आणू नये. कर्नाटकातून असाच एक कौतुकास्पद प्रकार समोर आला आहे, ज्यातून देशभरातील कुटुंबांनी धडा घेतला पाहिजे. नुकत्याच जाहीर झालेल्या कर्नाटक बोर्डाच्या दहावीच्या निकालात (कर्नाटक बोर्ड परीक्षा २०२५), बागलकोटमधील बसवेश्वर इंग्रजी माध्यम शाळेतील अभिषेक चोलचागुड्डा या विद्यार्थ्याला ६०० पैकी फक्त २०० गुण मिळाले आहेत. दहावीच्या बोर्ड परीक्षेत नापास झाल्यामुळे, त्याचे मित्र आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी त्याची खूप खिल्ली उडवली. मात्र मुलगा नापास झाला असला तरी त्याचे पालक त्याच्या पाठीशी उभे राहिले. असा निकाल आल्यानंतर मुलांना ओरडलं जातं, परंतु अभिषेकच्या पालकांनी वेगळा मार्ग निवडला. त्यांनी आपल्या मुलाचे मनोबल वाढवण्यासाठी केक कापला आणि कुटुंबाने एकत्र आनंद साजरा केला आणि त्याला प्रोत्साहन दिलं.

मी पुन्हा परीक्षा देईन आणि आयुष्यात पुढे जाईन. अभिषेकची ही गोष्ट सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे आणि बरेच लोक त्यावर प्रतिक्रिया देत आहेत. अभिषेकच्या पालकांचं भरभरून कौतुक करत आहेत.

## प्रवाशांसाठी गूड न्यूज... पुणे नागपूर वंदे भारत लवकरच होणार सुरू

### खुद्द केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनीच दिले संकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ नागपूर**

वर्षातील बाराही महिने प्रचंड गर्दी असल्याने मिळेल ते तिकीट घेऊन नागपूर-पुणे- नागपूर असा रेल्वे प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी गूड न्यूज आहे. लवकरच या मार्गावर वंदे भारत एक्स्प्रेस ही जलद गती ट्रेन सुरू केली जाणार आहे. खुद्द केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनीच तसे संकेत दिले आहेत.

हडपसर येथून सुरू होणाऱ्या हडपसर-जोधपूर एक्स्प्रेस व एमजीआर चेन्नई सेंट्रल-भगत की कोठी एक्स्प्रेस गाड्यांचे उद्घाटन केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दोन दिवसांपूर्वी केले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते म्हणाले की, पुणे-नागपूर वंदे भारत एक्स्प्रेस सुरू करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली आहे.वैष्णव यांचे हे वक्तव्य नागपूर-पुणे-नागपूर मार्गावर प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवाशांसाठी मोठे दिलासादायक आहे. कारण नागपूर-पुणे-नागपूर प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवाशांची रोजची संख्या हजारोंच्या घरात आहे. १४ ते १६ तासांचा हा प्रवास करण्यासाठी बहुतांश प्रवासी रेल्वेला प्राधान्य देतात. त्यामुळे या मार्गावर वर्षातील ३६५ ही दिवस मोठी गर्दी असते. परिणामी अनेकांना रेल्वेचे कन्फर्म तिकीट मिळतच नाही. जे मिळाले ते तिकीट घेऊन प्रवासी रेल्वेत चढतात. अनेक जण खासगी बसचा पर्याय निवडतात. मात्र, बसने एवळा लांबचा प्रवास करताना प्रवाशांची कंबरमोड होते. प्रवास भाडेही जास्त जाते आणि अनेक कारणांमुळे बसचा प्रवास



कंटाळवाणा ठरतो. त्यामुळे या मार्गावर वंदे भारत एक्स्प्रेस चालविण्यात यावी, अशी सुमारे दोन वर्षापासूनची प्रवाशांची मागणी होती. त्या संबंधाने प्रवासी संघटना, लोकप्रतिनिधी यांच्याकडून तसे निवेदनही रेल्वे मंत्रालय, रेल्वे प्रशासनाकडे गेले होते. मात्र, वंदे भारत ट्रेन सुरू करण्याचा अधिकार सर्वस्वी रेल्वे मंत्रालयाचा असल्याने रेल्वे अधिकाऱ्यांकडून हतबलता व्यक्त होत होती. आम्हालाही ही गाडी सुरू व्हावी, असे मनोमन वाटत असल्याची प्रतिक्रिया अधिकारी खासगीत व्यक्त करीत होते. या पार्श्वभूमीवर, खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीच केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांची चर्चा झाल्याचे आणि सर्व काही सकारात्मक असल्याचे पुढे आल्याने नागपूर-पुणे-नागपूर वंदे भारत सुरू करण्याच्या हालचाली सुरू झाल्याचे संकेत मिळाले आहे.

**मोठा प्रतिसाद मिळणार**

गेल्यावर्षी सुरू करण्यात आलेली नागपूर-सिकंदराबाद ही २२ कोचची वंदे भारत एक्स्प्रेस अनेक महिने रिकामी ठणठण धावत होती. त्यामुळे रेल्वेला चांगलाच आर्थिक फटका बसला. तोटा कमी करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने या गाडीचे आठ कोच कमी केले. तरीसुद्धा तिला प्रवाशांकडून फारसा प्रतिसाद नाही. याउलट नागपूर-पुणे-नागपूर तंदे भारत एक्स्प्रेस सुरू झाल्यास ही गाडी वर्षभर प्रवाशांनी भरभरून धावणार आहे. या गाडीमुळे प्रवाशांना तर फायदा होईलच मात्र, रेल्वे प्रशासनालाही उत्पन्नाच्या रूपाने मोठा फायदा मिळणार आहे.

## संपादकीय ......

# पाकची भीतीने गाळण

दहशतवाद्यांनी कधी कल्पनाही केली नसेल, अशी कठोर शिक्षा त्यांना व ज्यांनी हा कट रचला अशांना दिली जाईल. १४० कोटी भारतीयांची इच्छाशक्ती आता दहशतवादाला प्रोत्साहन देणार्यांचा कणा मोडून टाकेल, असा स्पष्ट इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला उद्देशून दिला होता. आता पहलगाममधील हल्ल्याला लष्करी कारवाईद्वारे चोख प्रत्युत्तर देण्यासाठी पंतप्रधानांनी संरक्षण दलांना संपूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. संरक्षणविषयक उच्चस्तरीय बैठकीत पंतप्रधानांनी दिलेल्या या संदेशामुळे पाकिस्तानला आता धडा शिकवला जाणार, अशीच चिन्हे आहेत.

२६-११ च्या मुंबईवरील हल्ल्यानंतर भारताने प्रतिहल्ला करणे आवश्यक होते; पण तसे घडले नाही; पण उरी हल्ल्यानंतर, भारताने पाकिस्तानात घुसून सर्जिकल स्ट्राईक केला, तर पुलवामाच्या हल्ल्यानंतर बालाकोटमध्ये हवाईहल्ला चढवून भारताने पाकला चांगलाच झटका दिला होता. मात्र, घाईघाईत कोणताही निर्णय घेणे योग्य होणार नाही. सैन्यदलांची तयारी, देशातील राजकीय परिस्थिती व आर्थिक ताकद या तीनही मुद्द्यांवर विचार केल्यानंतर धोरण निश्चित होईल. सुदैवाने संपूर्ण देशातून पाकिस्तानविरोधी करवाईसाठी जनसमर्थन आहेच. योग्य ती कृती करण्यासाठी सर्वच पक्षांनी भारत सरकारला पाठिंबा दिला आहे. जम्मू-काश्मीरच्या दुकानदारांनी बंद पाळून व मोर्चे काढून पहलगाममधील मृतांबद्दलच्या भावना प्रकट केल्या. 'कॉन्फडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स' या व्यापार्यांच्या संघटनेने पाकिस्तानशी तत्काळ व्यापार थांबवण्याचा निर्णय घेतला आहे.

देशहितापुढे व्यापारी हित मोठे नाही, असे या संघटनेचे मत असून, ते अभिनंदनीय आहे. काश्मीरमधील ४८ पर्यटनस्थळे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून बंद करण्याचा सावधगिरीचा उपाय योजला आहे. तसेच, जम्मू-काश्मीरमधील ६० पाकिस्तानी नागरिकांना तेथून हाकलून दिले आहे. २०१० मध्ये अनेक दहशतवाद्यांनी शरणागती पत्करत, मुख्य प्रवाहात येण्याचा निर्णय घेतला होती. अशा दहशतवाद्यांच्या पाकिस्तानी पत्नी, तसेच मुलांना देशाबाहेर काढले जात आहे. याप्रकारच्या उपाययोजना करणे गरजेचे होते. तसेच, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी अल्जेरिया, ग्रीस, गयाना, पनामा, स्लोव्हानिया, सिएरा लिओन, तसेच सोमालिया या संयुक्त राष्ट्रांमधील सुरक्षा परिषदेच्या ७ अस्थायी सदस्य असलेल्या देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांसोबत चर्चा केली आहे. सुरक्षा परिषेदत भारताला समर्थन मिळण्यासाठी परराष्ट्र विभाग गंभीरतापूर्वक प्रयत्न करत आहे; तर दहशतवादाला खतपाणी घालण्याचा देशाचा काळा इतिहास पाकचे संरक्षणमंत्री ख्वाजा असिफ यांनी उघड केल्याचे सांगत, भारताने संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठावर पाकचे कारस्थान चव्हाट्यावर आणले आहे.

पाकिस्तान हा दहशतवादाला प्रोत्साहन देणारा बदमाश देश आहे, असे संयुक्त राष्ट्रांमधील भारताच्या सहायक कायम प्रतिनिधी योजना पटेल यांनी सांगितले आणि पाकची अब्रूच वेशीवर टांगली. पाकिस्तानसोबत केलेल्या सिंधू करारातील पाणी थांबवण्याचा निर्णय भारताने यापूर्वीच घेतला असून, प्रत्यक्षात हे पाणी थांबवले, तर भारताने युद्धासाठी तयार राहावे. घोरी, शाहिन, गझनवी ही क्षेपणास्त्रे केवळ प्रदर्शनासाठी नाहीत, तर भारताला उत्तर देण्यासाठी ठेवली आहेत. आमच्याकडे १३० अण्वस्त्रे असून, तीही आम्ही वापरू, अशी धमकी पाकचे मंत्री हनीफ अब्बासी यांनी दिली आहे. यापूर्वीही पाकिस्तानच्या माजी संरक्षणमंत्र्यांनी अशा वल्गना केल्या होत्या; पण भारताने सामर्थ्य दाखवताच, त्यांचे हे शब्द हवेत विरून गेले होते. पाकिस्तानकडे अणुबॉम्ब आहे, म्हणून आपण 'अरेला कारे' करता कामा नये, ही मिळमिळीत भूमिका भारताने केव्हाच सोडून दिलेली आहे. एकीकडे पाकिस्तान युद्धासाठी तयार असल्याच्या बाता मारत असतानाच, त्या देशाची अवस्था मात्र बिकट होत चालली आहे.

बलुचिस्तान आणि सिंध प्रांतांत स्वतंत्र देशाच्या मागणीसाठी आंदोलने सुरू आहेत. खैबर पख्तुनख्वामध्ये तालिबानी बंडखोरांचा धुडगूस सुरू आहे; तर पाकव्याप्त काश्मीरमध्ये पाक सरकारकडून होत असलेल्या अन्यायाविरोधात लोक रस्त्यावर येत असतात. पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी भारतविरोधी प्रक्षोभक वक्तव्य केल्यानंतरच पहलगाम हल्ला झाला. ते भारतविरोधी कितीही गर्जना करत असले, तरी उद्या भारत काय करेल, या भीतीपोटी मुनीर यांच्यासह काही लष्करी अधिकारी व नेत्यांनी कुटुंबीयांना विदेशात धाडले आहे. रक्ताचे पाट वाहतील, अशी धमकी देणारे पाकिस्तानचे खासदार बिलावल भुट्टो यांनीही भावंडांना कॅनडाला धाडले आहे. शेकडो लष्करी अधिकारी व सैनिकांनी नोकरीचाच राजीनामा देऊन टाकला आहे.

खरे तर, पहलगामनंतर भारताने घेतलेल्या काही कठोर निर्णयांमुळे पाकिस्तान हादरला आहे. शिवाय, भारताच्या निम्मेही सैन्यबळ पाकिस्तानकडे नाही. भारत तुफानी हल्ला चढवेल, या भीतीमुळे पाकिस्तानची सध्या गाळण उडाली आहे. पाकिस्तानला अद्दल घडवण्याची पूर्ण मोकळीक भारतीय लष्करास दिल्याच्या वृत्तामुळे पाकिस्तानला घाम फुटला आहे. १९७१ च्या युद्धात भारताने पाकिस्तानचे ८ हजार सैनिक मारले होते. तसेच, पाकिस्तानची ८६ विमाने व २२६ रणगाडे नष्ट केले होते. पाकिस्तानच्या ९० हजार सैनिकांना भारतीय लष्कराने युद्धकैदी म्हणून ताब्यात घेतले.

या युद्धात झालेल्या पराभवानंतर पाकिस्तानचे अध्यक्ष जनरल याह्याखान यांना राजीनामा द्यावा लागला होता. त्यापूर्वीचे १९६५ चे युद्ध हे प्रामुख्याने वायव्य काश्मीर आणि पंजाब या भागात लढले गेले. लालबहादूर शास्त्री यांचे उत्तुंग नेतृत्व देशाला तेव्हा लाभले होते. त्यात पाकिस्तानच्या ५ हजार सैनिकांचा भारताने खात्मा केला होता. पाकचे ३०० रणगाडे आणि ५० लढाऊ विमाने उद्ध्वस्त केली होती. त्या युद्धात भारतीय सैन्याने लाहोरच्या दिशेने कूच केले होते; पण आंतरराष्ट्रीय आवाहनानंतर भारताने लाहोरवर आक्रमण करण्याचे टाळले आणि त्यामुळे पाकिस्तान बचावला. त्यावेळी पाकिस्तानने काश्मीर बळकावण्याची योजना आखली होती, ती भारताने उधळून लावली आणि त्यांना सणसणीत चोप दिला. वारंवार मार खाऊनही पाकिस्तानचे पोट भरलेले नाही, असे दिसते.

# बोगस बियाणे, खते औषधी विकली जाणार नाही याची दक्षता घ्या!

## खरीपपूर्व नियोजन बैठकीत आ. प्रवीण तायडे यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५चांदुर बाजार** - अचलपूर व चांदूरबाजार तालुक्यात शेतकऱ्यांना बोगस बियाणे, खते व औषधी विकली जातात, अशा शेतकऱ्यांच्या अनेक तक्रारी आल्या आहेत. त्या अनुषंगाने येत्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना बोगस बियाणे, खते व औषधी विकली जाणार नाही याची कृषी विभागाने दक्षता घ्यावी, तसेच कृषी निविष्ठा विक्री संचालकांनी यासाठी सहकार्य करावे.केवळ दक्षता समित्या नेमूण शांत बसू नये. आवश्यकता भासल्यास स्वतः तपासणी करून, कृषी निविष्ठांची गुणवत्ता तपासावी. शेतकऱ्यांची फसवणूक होऊन नाडल्या जाणार नाही, याकडे लक्ष द्यावे, असे निर्देशआ. प्रवीण तायडे यांनी चांदूरबाजार तालुका खरीपपूर्व कृषी आढावा बैठकीत केले. यावेळी ते बैठकीचे अध्यक्ष म्हणून बोलत होते. ही आढावा बैठक तहसील कार्यालयाच्या सभागृहात घेण्यात आली.सभेला तहसीलदार रामदास शेळके, जिल्हा कृषी अधीक्षक सहल सातपुते, अधिकारी उपविभागीय कृषी उज्वल आगरकर, गटविकास अधिकारी नारायण आमझरे, पं.स. कृषी विस्तार अधिकारी गजेंद्र देशमुख उपस्थित होते. यावेळी कृषी सहाय्यक सतीश निमकर यांनी फळबाग लागवड व माधव देशमुख यांनी वनराई बंधारे योजनेत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांना आमदारांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. बैठकीचे प्रास्ताविक कृषी अधिकारी फाल्गुनी ननीर यांनी केले. त्यांनी खरीप नियोजन व कृती विभागाच्या विविध योजनांची तपशीलवार माहिती दिली. आढावा बैठकीचे संचालन जयश्री चव्हाण, तर आभार प्रदर्शन सुनील तेलखेडे यांनी केले. बैठकीला शेतकऱ्यांसह कृषी विभागाचे सर्व अधिकारी, कर्मचारी तथा भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### शेतीच्या बांधावर जाऊन सुक्ष्म नियोजन करा

यात्रसंगी बोलताना आमदार म्हणाले, कृषी विभागाने शेतकऱ्यांना त्यांच्या योजनांचा शंभर टक्के लाभ, तसेच योजनेचा पूर्ण मोबदला शेतकऱ्यांना द्यावा. यावर्षीचा खरीप व रब्बी हंगाम शेतकऱ्याना कसा फायदेशीर खेल यासाठी बांधावर जावून खरीप हंगामाचे सुक्ष्म नियोजन करावे असे निर्देश ही आ.प्रवीण तायडे यांनी तालुका कृषी अधिकाऱ्याला दिलेत.




## शेवग्याची शेंगच नाही तर सालं देखील फायदेशीर! रोज प्या शेवग्याचा चहा, वजन होईल भरभर कमी

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक** - आपल्या आहारात अशा अनेक गोष्टी असतात ज्याचा आपल्याला फायदा होतो. फक्त फळे आणि आणि भाज्याच नाही तर त्याच्या सालीचा देखील आपल्याला फायदा होतो.ज्यात शेवग्याच्या शेंग्यांचा देखील समावेश आहे. शेवग्याच्या शेंगाची भाजी, शेव, चिक्की, सूप, चटणी असे अनेक पदार्थ बनवले जातात. परंतु, त्याच्या सालीचा देखील आपल्याला उपयोग होतो.




शेवग्यांची शेंग खाण्यासाठी आपण त्याच्या वरची साल काढून फेकून देतो.परंतु, ती फेकून देण्यापेक्षा त्याचा चहा प्यायल्याने आपले वजन कमी होऊ शकते.शेवग्याची शेंग वजन कमी करण्यास मदत करते. यामध्ये भरपूर प्रमाणात फायबर, प्रोटीन आणि जीवनसत्त्व आहेत. जे शरीराला आवश्यक प्रमाणात ऊर्जा मिळवतात.

शेवग्यांच्या शेंगमध्ये फायबर जास्त प्रमाणात असल्यामुळे पचन सुधारते तसेच भूक देखील कमी लागते. प्रोटीन भरपूर असल्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते. ज्यामुळे वजन कमी करताना स्नायूंची ताकद टिकून राहाते. यामध्ये जीवनसत्त्व आणि खनिजे असतात जे पोषक तत्वांची कमतरता भरून काढतात. हा शेवग्याचा शेगांचा चहा कसा करायचा पाहूया.

**साहित्य**

शेवग्याची शेंग्याची सालं - २ कप वेलची - १ दालचिनी -१

**कृती** - १. सगळ्यात आधी शेवग्याची शेंग सोलून त्याची सालं काढून घ्या. उन्हामध्ये चांगली सुकवून घ्या.

२. त्यानंतर मिक्सरच्या भांड्यामध्ये सुकवलेली शेंवग्याची शेंग, दालचिनी आणि वेलची घालून पावडर वाटून घ्या.

३. हा पावडर हवा बंद डब्यात भरुन ठेवा. पिण्यापूर्वा चमचाभर पावडर कपमध्ये घेऊन त्यात गरम पाणी घाला.

४. नियमितपणे हा चहा प्यायल्याने वजन कमी होण्यास मदत होईल.

# केळीच्या साली फेकू नका, असं बनवा फायदेशीर खत, जाणून घ्या सविस्तर

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक**
बऱ्याचदा केळीच्या साली हा कचऱ्यातच फेकल्या जातात. मात्र या केळीच्या सालीपासून फायदेशीर खत बनवता येऊ शकते. हेच खत परसबागेत किंवा गार्डनमधील झाडांना फायदेशीर ठरू शकते. या खताचा वापर केल्याने झाडे नेहमीच हिरवीगार राहतील. केळीच्या सालींपासून खत कसे बनवावे, ते या भागातून समजून घेऊया...

**हे सेंद्रिय खत रसायनमुक्त आहे.** अनेकदा परसबागेत भाजीपाल्यासह फुलांची झाडे पाहायला मिळतात. शिवाय घराच्या बाल्कनीमध्ये विविध फुलांची झाडे लावली जातात. मात्र योग्य काळजी न घेतल्याने झाडांची वाढ होत नाही, काही झाडे जगत नाहीत. अशावेळी बाजारातून खते आणून कुंड्यांमध्ये टाकली जातात, पण या खतांमध्ये भरपूर रसायने असतात. अशा परिस्थितीत, तुम्ही केळीच्या सालींपासून नैसर्गिक खत बनवू शकता, जे झाडांना चांगल्या प्रमाणात पोषक तत्वे प्रदान करते.

**असे बनवा केळीच्या सालीपासून फायदेशीर खत**

केळीच्या सालींव्यतिरिक्त, तुम्हाला एक छोटे कंटेनर आणि पाणी लागेल.

प्रथम केळीच्या साली बाजूला गोळा करा.

आता सालीचे पातळ तुकडे करा आणि बाजूला ठेवा.

नंतर एका मोठ्या भांड्यात पाणी उकळवा आणि पाणी उकळले की त्यात साली घालून शिजवा.

सुमारे १५ ते २० मिनिटे शिजवल्यानंतर गॅस बंद करा.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




त्याचे पाणी काढून टाका आणि साली तीन-चार दिवस तसेच राहू द्या.

तुम्हाला हवे असल्यास, हे पाणी फेकून देण्याऐवजी, तुम्ही ते एखाद्या झाडातही ओतू शकता.

३-४ दिवसांनी तुम्हाला दिसेल की खत पूर्णपणे तयार झाले आहे.

आता तुम्ही तुमच्या गरजेनुसार कुंड्यांमधील रोपांसाठी ते वापरू शकता.

**प्रचंड तापमानात झाडे थंड राहतात.**


जर तुमची झाडे नीट वाढत नसतील तर हे खत खूप उपयुक्त आहे. केळीच्या सालींमुळे पोषक तत्वे मिळतात. केळीच्या सालीचे पाणी जमिनीत ओलावा टिकवून ठेवते. यामुळे उन्हाळ्याच्या हंगामात वनस्पतींना थंडावा मिळतो. रोपाच्या योग्य वाढीव्यतिरिक्त, त्यावर अधिकाधिक फुले देखील येतील.

हे खत आठवड्यातून दोनदा वापरता येते. रोपाला जितके जास्त खत घालता येईल तितके ते चांगले.

# अंबा एक्सप्रेस छत्रपती शिवाजी टर्मिनलपर्यंत चालविण्यात यावी

## माजी खा. नवनीत राणा यांची रेल्वेच्या मुख्य व्यवस्थापकाकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती** - अमरावती ते मुंबई सीएसटीपर्यंत चालविण्यात येणारी अंबा एक्स्प्रेस प्लॅट फ्रॉमच्या कामाचे कारण समोर करून दादरपर्यंत चालविण्यात येत होती. मात्र आता काम पूर्ण झाल्याने सदरची गाडी पूर्ववत मुंबई सीएसटी स्टेशनपर्यंत चालविण्यात यावी, अशी मागणी माजी खासदार नवनीत राणा यांनी रेल्वेच्या मुख्यव्यवस्थापकाकडे केली आहे.अमरावती - मुंबई ट्रेन न. १२१११ ही अंबा एक्सप्रेस गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल मुंबईपर्यंत सुरू होती. या गाडीला अमरावती जिल्ह्यासहविदर्भातील अनेक विद्यार्थ्यांचे, रुग्णांचे व व्यापारी वर्ग यांची या पसंती होती. परंतु आता ही गाडी फक्त दादर स्टेशनपर्यंत जाते. त्यामुळे प्रवाशांना त्रास होत आहे. अमरावतीवरून मुंबईत जाणारी ही एकमेव गाडी असून प्लॅट फ्रॉमच्या कामामुळे ही गाडी दादर पर्यंत चालविण्यात येत होती मात्र आता काम पूर्ण झाल्याची माहिती आहे. त्यामुळे सदरची गाडी मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनलपर्यंत चालविण्यात यावी, अशी मागणी



भाजपा नेत्या माजी खासदार नवनीत रवी राणा यांनी लेखी पत्राद्वारे रेल्वेचे मुख्य महा व्यवस्थापक श्री. मीना व मुंबई डीआरएम व भुसावळ डीआरएम यांना केली आहे.

# अमरावती विद्यापीठ महिला स्तरावरील विद्यार्थी संसद चमूचे राष्ट्रीयवर यश

## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती.** अखिल भारतीय आंतविद्यापीठ राष्ट्रीय महिला विद्यार्थी बाबा संसदर २०२४-२५ मध्ये संत गागे अमरावती विद्यापीठाच्या महिला विद्यार्थी खासदार चमूने उत्कृष्ट तृतीय क्रमांक पटकावला आहे. ही कोड सेन्चुरियन युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, ओडिसा येथे नुकतीच संपन्न झाली.

या सुंदर यशाचे विद्यापीठ कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते यांनी महिला खासदार चमूचे अभिनंदन केले आहे. कुलगुरु कार्यालयात छोटेखानी सत्कार कार्यक्रम कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते यांच्या संपूर्ण संसद चमूचा सत्कार करण्यात आला. या सदस्य प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संचालक डॉ. राजीव बोरकर विद्यार्थी विकास विभाग आणि इतर मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार प्राप्त चमू मध्ये कु. श्रावणी रोटे, कु. नफिसा शब्बीर हुसेन, कु. आरिफा शब्बीर हुसेन समावेश होता. या सदस्यांसाठी डॉ. अभिजित आणि डॉ. मृणाल महाजन यांनी व्यवस्थापन म्हणून काम पाहिले.संत गागे बाबा अमरावती युनिव्हर्सिटी महिलांचे राष्ट्रीय स्तरावर आलेले हे यश निश्चित प्रेरणादायी आणि इतरांनी सुद्धा प्रेरणा असे मत कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी व्यक्त केले.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. ५ मे २०२५

शहर/ग्रामिण


# जिल्हा बँकेच्या बैठकीत खोटे ठराव घेत असल्याचा आरोप

## ११ संचालकांचे बँक अध्यक्ष, सीइओंना पत्र पुढील आठवड्यात सभा घेण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती** – जिल्हा मध्यवर्ती बँकेत १ एप्रिल रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत संचालकांनी केलेल्या चर्चा इतिवृत्तात न घेता आणि बहुमताने ठराव नामंजूर असूनसुद्धा ठराव मंजूर असा खोटा दराव लिहिल्याचा आरोप ३० एप्रिल रोजी झालेल्या सभेत बबलू देशमुख यांनी केला. याबाबत बबलू देशमुख गटातील ११ संचालकांनी सभाध्यक्ष व सीईओंना तसे पत्र दिले आहे. यामध्ये त्यांनी बँकेत आर्थिक अपहार झाल्याचाही आरोप करीत २, ७, २४ आणि ४० या विषयांवर आक्षेप घेतला आहे. त्यामुळे नाबार्डच्या विषयांना मंजुरी देत इतर सर्व विषय तात्पुरते नामंजुर करीत आठ दिवसांनी पुन्हा सभा घेण्याची मागणी पत्राव्दारे केली आहे.११ संचालकांनी दिलेल्या पत्रानुसार २३ ऑक्टोंबर २०२४ च्या सभेतील विषय क्र. २ ला संचालक मंडळाच्या सभेचे खोटे प्रोसिडिंग लिहिल्याने ठराव नामंजूर केला होता. कार्यवाहीची नोंद घेण्यास विरोध असताना ठरावमंजूर असा लिहिला. १ एप्रिल २०२५ च्या सभेत विषय क्रमांक ७ मध्ये संचालक मंडळ सभेने समिती नेमून दिली होती. परंतु ठरावात समिती नमूद नाही. ठरल्याप्रमाणे ठराव लिहिलेला नाही असा ठराव खोटा लिहूनही ठराव सर्वानुमते मंजूर असे चुकीचे लिहिले आहे. विषय क्र. २४ ला ११ संचालकांनी मान्यता दिलेली नव्हती. टिप्पणीमध्ये सीएचे जोडलेले मत २७ डिसेंबर २०२४ च्या मेलचे आहे. विषयांकित ज्या प्रोव्हिजन करिता मत घ्यायला लावले ते नाही, ११ संचालकांची मान्यता दर्शवून खोटा ठराव लिहिला आहे. खोटा ठराव प्रोसिडिंग बुकमध्ये लिहू नये अशी मागणी पत्राव्दारे केली आहे. विषय क्र. ४० इतिवृत्तातील ११ संचालकांनी दिलेले लेखी मत नमूद आहे. ज्यामध्ये विषय नामंजूर करण्याचे स्पष्ट लिहिलेले आहे परंतु ठराव सर्वानुमते मंजूर असा खोटा लिहिलेला आहे. बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष हे नेहमीच खोटे ठराव लिहित आहेत. सभागृहामध्ये संचालकांनी नोंदविलेल्या मतांची नोंद इतिवृत्तात घेत नाही. खोट्या समित्या निर्माण करून बँकेचे करोडो रुपयांचे आर्थिक नुकसान करीत आहे, असा आरोप पत्रातून ११ संचालकांनी केला आहे. सोबतच बँकेचे संचालक प्रकाश



काळबांडे यांना उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाने स्थगिती दिलेली असून सुद्धा व त्यांनी ती माहिती बँकेला पुरवलेली असून सुद्धा अध्यक्ष व उपाध्यक्षांनी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रकाश काळबांडे यांना सभेची नोटीस दिली नाही. ही उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवमानना आहे. त्यामुळे ३० एप्रिलच्या सभेत याचा निषेध नोंदविण्यात आला. तसेच विषय क्र.८–नाबार्ड तपासणीमध्ये बरेच दोष दर्शविलेले नाहीत. जे नाबार्ड तपासणी चमुने संचालक मंडळ सभा२७/०२/२०२५ च्या सभेमध्ये सांगितले होते. त्यांनी सादर केलेल्या अहवालावर ०८/०६/२५ पूर्वी संचालक मंडळ सभेची मान्यता घेऊन तशा मान्यता प्राप्त ठरावासह पूर्तता अहवाल (कम्लायन्स रिपोर्ट) सादर करण्याचे सोबत जोडलेल्या मेलमध्ये कळविण्याचे सांगितले. बँकेने लिहिलेल्या टिप्पणीप्रमाणे संबंधित विभाग मुद्याची पूर्तता करणार आहेत. परंतु पूर्तता परिपूर्ण केली की नाही हे पाहणेसुद्धा गरजेचे असल्यामुळे बँकेच्या मागील दोन वर्षाचे सवईप्रमाणे अगदी वेळेवर विषय न ठेवता दर १५ दिवसांनी संबंधित विभागाने केलेल्या विषयांची पूर्तता तपासण्याकरिता ११ संचालकांनी समिती नियुक्त करण्याची शिफारत अध्यक्ष व सीईओंकडे केली आहे. समितीचे अध्यक्ष व्ही. डब्ल्यू. जगताप असणार असून समितीमध्ये सदस्य आर. व्ही. गायगोले, एस. बी. गावंडे, एस. एन. भारसाकळे, एस. बी. साबळे, पी. बी. काळबांडे या संचालकांचा समावेश करण्यात आला आहे. समितीमधून मात्र अध्यक्ष,उपाध्यक्षांना वगळले आहे. ११ संचालकानी दिलेल्या पत्राप्रमाणे ताबडतोब संचालक मंडळाच्या सभेमध्ये कार्यकारी समिती गठित करण्यासंबंधाने विषय घेऊन कार्यकारी समिती गठित करावी, तोपर्यंत अवैध मनमानी पद्धतीने निर्माण कार्यकारी समितीच्या सभा नियमबाह्य पध्दतीने घेण्यात येऊ नये. १.२.८. अ प्रमाणे बँकेने आर्थिक स्टेटमेंटमध्ये रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या सूचनाचे पालन केले नाही असे म्हटले आहे. अशा सर्व समित्या बनविण्याकरिता संचालक मंडळाच्या सभेत विषय घ्यावा, एनपीए, सीबिएस मधून निघत नसल्याचे आक्षेप आहे तसेच मॅन्युअली व चुकीचा करत असल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे. कामे खर्च समितीसमोर ठेवावे, तज्ञ संचालक नियुक्ती बाबतचा विषय संचालक मंडळ सभेसमोर ठेवावा. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या विरुद्ध सहकार निबंधक कार्यालयात १२ संचालकांच्या तक्रारी प्रलंबित असल्याने बँकेने या संदर्भातील कागदपत्रे जिल्हा उपनिबंधक कार्यालयाला पुरवावी. शिक्षकांच्या खात्यात मान्यतेशिवाय जास्तीची रक्कम नावे टाकून शिक्षक खातेदारांची फसवणूक झाली व एक प्रकारे अपहार झालेला आहे. याबाबत शिक्षक संघटनेने तक्रारीसुद्धा केल्या आहेत व बऱ्याच शिक्षकांनी त्यांचे खाते राष्ट्रीयकृत बँकेत वळती केलेली आहेत.

# निराधार, श्रावणबाळचे पैसे तात्काळ वितरीत करावेत– उपमुख्यमंत्री पवार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती**


संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांना केंद्राच्या निधीची वाट पाहू नये. राज्याने निधी तातडीने वितरीत करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.आज श्री. पवार यांनी विविध विभागाचा आढावा घेतला. यावेळी आमदार सुलभा खोडके, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, विशेष पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर आदी उपस्थित होते.श्री. पवार यांनी मनेरगा आणि इतर योजनांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारच्या हिश्याच्या निधीची वाट पाहण्यात येते. मात्र यामुळे लाभार्थ्यांना लाभ मिळण्यास उशिर होत आहे. त्यामुळे केद्राच्या निधी वाट न पाहता लाभार्थ्यांच्या बँक खात्यात लाभ जमा करावा. डीबीटीमध्ये अडचणी येत असल्यास तातडीने आधार जोडणी करावी. निधी देण्यासाठी ३१ मार्च मूदत होती. त्यामुळे निधीचे तातडीने वितरण करावे.स्वस्त धान्य योजनेतून पात्र असणाऱ्या लाभार्थ्यांचा शोध घेवून अंत्योदयचा लाभ देण्यात यावा. धान्य वितरीत करताना मेळघाट परिसरातील आदिवासींना धान्य प्राधान्याने वितरीत करण्यात यावे. जिल्हा नियोजनमधून पोलिसांना निधी देण्यात येत असून त्यामधून पोलिसांना आवश्यक असणारी वाहने आणि इतर साहित्य देण्यात यावे. यासोबतच गेल्या शंभर दिवसांच्या कृती आराखड्यामध्ये चांगले काम होत आहे. यात सातत्य टिकवावे. यातून चांगले काम होईल, यासाठी लक्ष देण्यात यावे. जिल्हा नियोजनमधून करण्यात येणारी कामे वेळेत मंजुरी घ्यावी. तसेच ही कामे डिसेंबरअखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात यावे. अमरावती विमानतळाची धावपट्टी वाढवणे आणि या ठिकाणी रात्री विमान उतरण्याची सोय करण्यासाठी निधी उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे ही कामे तातडीने होण्यासाठी लक्ष द्यावे. सारथीच्या इमारतीसाठी जागा आणि निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे येत्या जून २०२६ पर्यंत बांधकाम पूर्ण करावे. तसेच या ठिकाणी उत्कृष्ट सोयी सुविधांसह भोजन व्यवस्था आणि वाहनतळाची व्यवस्था असावी. तसेच कामगारांना राहण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी असे निर्देश अजित पवारांनी दिले.

# नागपुरात भीषण अपघात, तिघांचा जागीच मृत्यू, टेम्पोचा चक्काचूर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५नागपूर** – नागपूरच्या नवीन कटोल नाका टोल प्लाझाजवळ कालमेश्वर रोडवर स्कुटी, ट्रक आणि मिनी टेम्पोचा भीषण अपघात झाला. या विचित्र अपघातात ३ जणांचा जागीच मृत्यू झालाय. अपघात इतका भयंकर होता की टेम्पोचा चक्काचूर झाला. अपघात झाल्यानंतर स्थानिकांनी तात्काळ धाव घेत मदत केली. जखमींना बाहेर काढले आणि जवळच्या रूग्णालयात दाखल करण्यात आले.

अपघातानंतर महामार्गावर वाहतूककोंडी झाली होती. पोलिसांनी घटनास्थळा धाव घेत पंचनामा केला अन् वाहतूक कोंडी सुरळीत केली.



प्राथमिक माहितीनुसार, कालमेश्वरहून नागपूरकडे जाणारी स्कूटी समोरून येणाऱ्या टेम्पोला धडकली.

यानंतर मिनी ट्रक आणि नवीन कटोल नाक्याकडून येणाऱ्या ट्रकमध्ये समोरासमोर धडक झाली. या अपघातात स्कूटीवरील दोन आणि मिनी ट्रकमधील एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. जखमी व्यक्तीला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्याची प्रकृती चिंताजनक आहे. या अपघातातील मृतांची नावे रोशन टेकाम, रमेश देहनकर आणि रामकृष्ण मसराम अशी आहेत. अपघात झालेले मालवाहू चार चाकीवाहन रविवारी संध्याकाळी कळमना कृषी उत्पन्न बाजार समितीत कृषी उपज पोहोचून परत काटोलच्या दिशेने जात होते. एका वाहनाला ओव्हरटेक करताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले, अन् समोरून येणाऱ्या ट्रकला धडकले.

अपघात इतका भीषण होता की घटनेच्या वेळेला त्या ठिकाणातून जात असलेल्या काही दुचाकी चालकांनाही झळ बसली. दुचाकी चालकही जखमी झाले. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, टेम्पोचा वेग जास्त होता, ज्यामुळे स्कूटीवरील नियंत्रण सुटले. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

# मॉर्निंग वॉकला गेला अन् कारनं उडवले; बँक कर्मचाऱ्याचा जागीच मृत्यू, शेगावात खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ शेगाव**

मॉर्निंग वॉक करण्यासाठी गेलेल्या व्यक्तीचा अपघाती मृत्यू झाला आहे. एका भरधाव वाहनाने एका बँक कर्मचाऱ्याला जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर कारचालक घटनास्थळावरून फरार झाला. ही धक्कादायक घटना बुलढाण्यातील शेगाव शहरातील खामगाव रोडवरील शिवांश सेलिब्रेशनजवळ पहाटेच्या सुमारास घडली आहे. पोलिसांना याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच मृतदेह शवविच्छेदनासाठी रूग्णालयात पाठवले. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.



महेंद्र श्रीराम सोंडकर (वय वर्ष ५४, रा. अकोला) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. महेंद्र नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकला गेले होते. यादरम्यान, एक कार वेगाने येत होती. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, पांढऱ्या रंगाच्या भरधाव वाहनाने सोंडकर यांना जोराची धडक दिली. धडक दिल्यानंतर वाहन चालक घटनास्थळावरून फरार झाला.

महेंद्र हे घटनास्थळी बेशुद्ध होऊन पडले. ते रक्तबंबाळ झाले. परिसरातील नागरिकांनी तातडीने पोलिसांना याची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह सईबाई मोटे सामान्य रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला. तसेच अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

या प्रकरणी पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पुढील तपास करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या हिट अँड रन घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. तसेच सोंडकर कुटुंबात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. यासह आरोपीला तातडीने अटक करून शिक्षा देण्यात यावी अशी मागणीही सोंडकर कुटुंबाने केली आहे.

# ४८९७ विद्यार्थ्यांनी दिली नीट परीक्षा, १०३ विद्यार्थी अनुपस्थित कडक पोलीस बंदोबस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–** रविवारी राष्ट्रीय चाचणी एजन्सी (एनटीए) द्वारे पूर्व–वैद्यकीय प्रवेश परीक्षा घेण्यात आली. जिल्ह्यातील ४ हजार ८९७ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली तर १०३ विद्यार्थी परीक्षा केंद्रावर पोहोचू शकले नाहीत. त्यामुळे त्यांची अनुपस्थिती नोंदविण्यात आली आहे.

रविवारी सकाळी ११ वाजल्यापासून विद्यार्थ्यांना हॉल तिकिटे देण्यात आली. वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचणे बंधनकारक होते. त्यामुळे सकाळपासूनच शहराबाहेरील गावांमधून येणाऱ्या विद्यार्थ्यांची गर्दी होती. दुपारी १.३० वाजेपर्यंत परीक्षा केंद्रावर पोहोचणाऱ्या विद्यार्थ्यांची कसून तपासणी करण्यात आली. परीक्षा केंद्राच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थिनीचे चप्पल आणि बूट तपासण्यात आले. तसेच कानातले, बोटातील अंगठ्या, बांगड्या, गळ्यातील साखळी किंवा मंगळसूत्र यासारख्या वस्तू काढून टाकण्यास सांगण्यात आले होते. याशिवाय, मुलांना पैशांचे पॅकेट, रुमाल, घड्याळ, गळ्यातील साखळी, अंगठी, बेल्ट, जॅकेट, स्कार्फ, बूट अशा सर्व वस्तू बाहेर ठेवण्यास सांगण्यात आले. त्यामुळे या प्रकारच्या कडक तपासणीमुळे विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण होते.या परीक्षेसाठी जिल्ह्यातील ५ हजार ४० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी ४ हजार ८९७विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली आहे. तर १०३ विद्यार्थी परीक्षेला गैरहजर राहिले. परीक्षा दिलेल्या केंदामध्येशिवाजी महाविद्यालय



या केंद्रावर (६४८) विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर ब्रजलाल बियाणी महाविद्यालय (७२०), व्हीएमव्ही महाविद्यालय (५२८), शासकीय पॉलिटेक्निक महाविद्यालय (२४०), विमलाबाई देशमुख महाविद्यालय (५२८), शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (२४०), भारतीय महाविद्यालय (२४०), डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय (२४०), केशरबाई लाहोटी महाविद्यालय (२४०), नरसम्मा महाविद्यालय (२४०), डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय (२४०), शारीरिक शिक्षण हव्याप्र मंडळ (३६०), रामराव देशमुख कला महाविद्यालय (२१०) आणि तक्षशिला महाविद्यालय (३३६) आदी केंद्रावरून ४ हजार ९७४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. देशभरातील वैद्यकीय, दंत, आयुष, पशुवैद्यकीय आणि निवडक नर्सिंग महाविद्यालयांमधील विविध अभ्यासक्रमांच्या अंदाजे २.५० लाख जागांसाठी या विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आहे. दुपारी २ वाजता सर्व परीक्षा केंद्रांवर परीक्षा शांततेत सुरू झाली. सुमारे तीन तास चाललेल्या परीक्षेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

### कडक पोलिस बंदोबस्त

नीट परीक्षेच्या पार्श्वभूमीवर शहरात पोलिस आयुक्तालयाकडून कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती. शहरातील १४ परीक्षा केंद्रांवर झालेल्या परीक्षेसाठी गाडगेनगर, राजापेठ, फ्रेजरपुरा आणि बडनेरा पोलिस ठाण्यातील पथके तैनात करण्यात आली होती. परीक्षा केंद्रापासून १०० मी. परिसरात सर्वत्र कर्फ्यू लागू करण्यात आला. परीक्षा संपल्यानंतर कोणत्याही विद्यार्थ्याला परीक्षा केंद्राच्या परिसरात फिरण्याची परवानगी नव्हती.

# वन्यप्रेमींना वाघ,बिबट्यासह इतर वन्यप्राण्यांचे होणार दर्शन

## बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी प्राणीगणना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–** यावर्षी बुद्ध पौर्णिमा १२ मे रोजी असून या पौर्णिमेच्या दिवशी पर्यटक व वन्यजीवप्रेमी वाघ, अस्वल, रानगवे, दिवटे, लांडगे, कोल्हे या वन्य प्राण्यांसह सरपटणारे प्राणी व पक्ष्यांचे दर्शन घेण्याकरिता मेळघाट प्रकल्पात दाखल होणार आहेत. वाघ आणि बिबट्यासह ७०९ वन्य प्राणी आणि ३५० पक्ष्यांच्या प्रजातींचा याची देही याची डोहा अनुभव घेता येणार आहे. मात्र त्यांना नियमांचे काटेकोर पालन यादरम्यान करावे



लागणार आहे. वन्यप्राणी जवळून पाहण्यासाठी २४ एप्रिलपासून ऑनलाइन नोंदणी सुरू झाली आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्प अभयारण्याचे एकूण क्षेत्रफळ २७५७.९७ चौरस किमी आहे. बुद्ध पौर्णिमेच्या रात्री मेळघाट व्याघ्र प्रकल्पात प्राणीगणना केली जाते. या प्राणि गणनेमध्ये वन्यजीव प्रेमींनासुद्धा सहभागी होता येते. प्रकल्पातील सिपना, गुगामल, अकोट, मेळघाट, अकोला व पांढरकवडा अशा सहा वन्यजीववि भागात असलेल्या नैसर्गिक व कृत्रिम अशा पाणवट्यावर प्राणीगणने करिता मचाने तयार केल्या जातात. या मचानावर निसर्गप्रेमी व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी तसेच एका वन विभागा च्या कामगाराला स्थान दिल्या जाते. दरवर्षी या मचानांची संख्या वाढत याकरिता १८ ते ६० वर्षे वयोगटातील वन्यजीवप्रेमींना सहभागी होता येणार असून मचान उभारताना प्रथम येणाऱ्यास प्राधान्य दिले जाईल. मचानमध्ये एकच व्यक्ती आणि एक कामगार असेल. मेळघाट व्याघ्र प्रकल्प प्रशासन सहभागींच्या कला गुणांचा विचार करून सहभागींची निवड आणि मचान वितरण करेल. या संदर्भात मेलघाट प्रकल्प प्रशासनाने घेतलेले निर्णय सहभागींसाठी लागू असतील.

### व्याघ्र प्रकल्पातून भोजन, नाश्ता व पाण्याची व्यवस्था

गतवर्षी १६ मे रोजी बुद्ध पौर्णिमेच्या निमित्त आयोजित वन्यप्राणी दर्शन कार्यक्रमात निसर्गप्रेमी व ५८ स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. यावर्षी देखील सहभागी झालेल्या निसर्गप्रेमीकरिता बोर्डिंग पॉईंट ते मचानापर्यंत वनविभागाच्या वाहनाने पोहोचवणे व परत आणण्याची व्यवस्था करण्यात आली असून त्यासोबतच भोजन नाश्ता व पाण्याची व्यवस्था राहणार आहे.

### स्वागत..

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांचे माजी पालकमंत्री भाजपा अमरावती शहर अध्यक्ष प्रविण पोटे पाटील यांनी अमरावती विमानतळावर पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले यावेळी चेतन पवार उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे रविवारी अमरावती दौऱ्यावर होते.



# महाराष्ट्रात घडवून आणू कबड्डीचा सर्वात मोठा महाकुंभ - उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार

## ऑल इंडिया फेडरेशन कप स्पर्धेला उपमुख्यमंत्र्यांनी दिली सदिच्छा भेट





**विदर्भ प्रजासत्ताक दि.५ अमरावती –** भारतीय पारंपरिक कबड्डीचा खेळ आज व्यावसायिक खेळतही आपले अस्तित्व टिकवून आहे. कबड्डी स्पर्धाच्या प्रकार व स्वरूपात बदल झाल्याने आज संपूर्ण विश्वात कबड्डीचा डंका वाजत आहे. ऑल इंडिया फेडरेशन कप च्या निमित्ताने संपूर्ण कबड्डीचीं पंढरीचं अमरावतीत अवतरली असून आगामी काळात कबड्डीच्या कुंभमेळा भरविण्यासाठी शासन कबड्डी व खेळाडूंना सर्वोतोपरीयंत सहकार्य करणार असल्याचा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र राज्य कबड्डी फेडरेशनचे अध्यक्ष ना. अजितदादा पवार यांनी व्यक्त केला. विदर्भ अँमॅचूअर कबड्डी असोसिएशन, अमरावती जिल्हा कबड्डी असोसिएशन व शोध प्रतिष्ठान अमरावतीच्या वतीने आयोजित ४ींह ऑल इंडिया फेडरेशन कप पुरुष / महिला कबड्डी स्पर्धा २०२५ च्या अंतिम दिवशी ना. अजितदादा पवार यांनी स्पर्धेला भेट दिली. यावेळी त्यांनी आयोजनाची भरभरून प्रशंसा करीत खेळाडूंना शुभेच्छा प्रदान केल्यात. या स्पर्धेमधून भारतीय विश्वकप पुरुष व महिला संघ निवडला जाणार असल्याने उपमुख्यमंत्री महोदयांनी देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या प्रो-कबड्डी व इंटरनॅशनल खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. दरम्यान आ. सौ. सुलभाताई खोडके, भारतीय कबड्डी फेडरेशनचे महासचिव जितेंद्र ठाकूर, शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष यश खोडके यांनी त्यांचे स्वागत केले. पुढे बोलतांना उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार म्हणाले की, आजचा दिवस अमरावतीसाठी अभिमानाचा दिवस असून ऑल इंडिया फेडरेशन कपचा थरार अनुभवणे हा एक सुखद व अविस्मरणीय क्षण आहे. ही एवढी चांगली व्यवस्था आपण कधीही पाहिली नाही. पाहुण्या माणसांचे आदरातिथ्य कसे करायचे हे खरोखरच अविस्मरणीय आहे. आपल्या मातीच्या खेळातून आपला म्हणून व संस्कृती जपली जात असल्याचे गौरवपूर्ण उदगार ना. अजितदादापवार यांनी व्यक्त केले. दरम्यान ना. अजितदादा पवार यांनी पुरुष गटातील सर्व्हिसेस विरुद्ध राजस्थान या पहिल्या सेमीफायनल सामन्यांचा आनंद लुटला. तसेच सेमी फायनल खेळत असलेल्या इंडियन रेल्वे विरुद्ध तामिळनाडू महिलांच्या संघांचे सुद्धा उपमुख्यमंत्री महोदयांनी कौतुक केले.यावेळी क्रीडारसिक,प्रशिक्षक तसेच संपूर्ण राज्यातून आलेले सर्वजण क्रीडापटुंना टाळ्यांच्या गजरात प्रोत्साहन देऊन त्यांचे मनोबल वाढवीण्यासाठी अविरतपणे सातत्याने पुढाकार घेत असल्याचे चित्र याप्रसंगी लक्षवेधी ठरू पाहत होते.

# चिखलदऱ्यात वादळ-वाऱ्यासह अवकाळी पाऊस

## परतवाडा मार्गावरील घाटात गारपीट

### वाहन चालकांची तारांबळ, घेतला निसर्गाचा मनमुराद आनंद



**विदर्भ प्रजासत्ताक दि.५चिखलदरा–** अंगाची लाहीलाही करणाऱ्या तीव्र उकाड्यानंतर आज ४ मे रोजी चिखलदरा तालुक्यातील विविध भागात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. विशेष म्हणजे चिखलदरा ते परतवाडा मार्गावरील घाटात प्रचंड गारपीट झाल्याने वाहन चालकांची तारांबळ उडाली. परंतु, आकाशात इंद्र धुनष्य दिसल्यानंतर वाहन चालकांनी दऱ्या-खोऱ्यातील घाटवळणाच्या रस्त्याहून निसर्गाच्या नयनरम्य आल्हादायी वातावरणाचा आनंद घेतला.

विदर्भातील काही भागात सलग चार, पाच दिवस अवकाळी पावसाची शक्यता असल्याचा अंदाज हवामान खान्याने दिला होता. त्यामुळे आज दिवसभर ढगाळ वातावरण असले तरी गरमीचा उकाडा मोठया प्रमाणात होता. अशातच आज चिखलदरा तालुक्यातील विविध भागात अवकाळी पावसाच्या जोरदार सरी पडल्याने ग्रामीण भागातील जनतेला उकाड्यापासून दिलासा मिळाला. तर दुसरीकडे तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतात गहू, हरभराचे पीक असल्याने या अवकाळी पावसामुळे त्यांची एकच धांदल उडाली. अमरावती जिल्ह्यात काही दिवसांपासून ढगाळ हवामानाबरोबरच उन्हाची तीव्रता अधिक जाणवल्याने दपारी बारानंतर रस्त्यावरील वर्दळ अत्यल्प झाल्याने अघोषित संचारबंदी दिसून येत आहे. गेल्या आठ दिवसांपासून दिवसाचे कमाल तापमान ३६ ते ३७ अंश सेल्सियसपर्यंत होते. मात्र, हवेत दमटपणा असल्याने तापमान ३९ अंश सेल्सियस असल्याचे भासत होते. सूर्योदयानंतर लगेचच त्यामध्ये वाढ होते. दुपारनंतर डांबरी रस्ते, सिमेंटच्या इमारती तापल्यानंतर हेच तापमान सायंकाळी चार वाजता सर्वोच्च पातळीवर ३८ अंशापर्यंत पोहचते. वाढत्या उन्हाच्या झळामुळे आणि रस्ते तापल्यामुळे वाहनधारकांनी रस्त्यावर येणेच टाळत आहेत. वाहनधारकांची वर्दळ अल्प असल्याने रस्ते ओस पडले होते. अशातच आज चिखलदरा तालुक्यातील विविध भागात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. विशेष म्हणजे चिखलदरा ते परतवाडा मार्गावरील घाटात गारपीट झाली.

# संत सावजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण

## साव कलाल समाजाच्या विकासासाठी कटिबद्ध : सुनील खराटे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५ अमरावती** संत महात्म्यांच्या विचारांची कास धरून सर्व समाज बांधवांना सोबत घेऊन समाजभिमुख उपक्रम राबवित साव कलाल समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय साव कलाल समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवसेना नेते सुनील खराटे यांनी केले.साव कलाल समाजाचे आराध्य संत सावजी महाराज यांच्या कार्याचा परिचय समाजातील युवा वर्गाला व्हावा तसेच त्यांचे नेहमी स्मरण व्हावे या उदात्त हेतूने अखिल भारतीय साव कलाल समाजातर्फे संत सावजी महाराज यांचा पुतळा अमरावती येथील स्मशानभूमी मध्ये स्थापन करण्यात आला असून १ मे रोजी सावजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सुनील खराटे बोलत होते. स्मशानभूमीतील सावजी महाराज यांच्या पुतळ्याचे सुनील खराटे यांच्या हस्ते पूजन व हार अर्पण करून अनावरण करण्यात आले. यावेळी सावजी महाराज यांची



मुलगी, जावई, नातू राम धामंदे तसेच सावकालाल समाजाचे वरिष्ठ पदाधिकारी राष्ट्रीय सचिव अमोल चवणे, सुनील राऊत, राष्ट्रीय कोषाध्यक्ष सचिन पहाडे, , अमरावती जिल्हा अध्यक्ष गजानन कोल्हटकर, कार्याध्यक्ष नितीन कोल्हटकर, महिला आघाडीचा राष्ट्रीय अध्यक्ष सुनिता ताई बावनेर, प्रकाश दादा टाकळे, सतीश खराटे, सुनील समदुरकर, डॉ आशिष डगवार , सुरेंद्र जयस्वाल , महिला आघाडी सचिव सौ योगीता शंकरपुरेआदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी उपस्थित सावजी महाराज यांची मुलगी सौ विमलताई धामंदेयांनी आपले मनोगत व्यक्त करीत आज जयंतीच्या निमित्ताने सावजी महाराज यांच्या आठवणी जिवंत झाल्या असून त्यांचा पुतळा उभारून अखिल भारतीय साव कलाल समाजाने प्रशंसनीय कार्य केल्याचे त्या म्हणाल्या. याप्रसंगी ज्ञानेश्वर पाहाडे, प्रल्हादराव डगवार, चंद्रकांत दुधाने , प्रविन सावळे , मोहन मोहीते , ड नितीन कोल्हटकर , अविनाश पाटील, राजेंद्र पेलागडे , अरुण कट्यारमल , सतिश देवरे, ललीत समदुरकर, ज्ञानेश्वर घोडेराव, किरन शिंदे , अनंत लौटे, निळकंठ लोहकपुरे , सीमाताई पेलागडे, चंदाताई ददगाळ , किशोर सावळे आदित्य पेलागडे , राजेश लोहटे वमहाराष्ट्राच्या विविध भागातून आलेले समाज बांधव उपस्थित होते.

### शववाहिकेचे लोकार्पण

साव कलाल समाजातर्फे राबविण्यात आलेल्या एका उपक्रमाचा भाग म्हणून शववाहीका तयार करण्यात आली असून या शव वाहिकेचा लोकार्पण सोहळा नागेश्वर मंदिरात पार पडला. यावेळी अखिल भारतीय साव कलाल समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील खराटे यांच्या उपस्थितीत हिंदू स्मशानभूमी संस्थेचे अध्यक्ष ड.आर. बी.अटल यांच्याकडे शववाहीकेच्या चाव्या सुपूर्द करून लोकार्पण करण्यात आले. एकच नव्हे तर दोन शववाहीका देऊन साव कलाल समाजाने आपल्यातील दातृत्वाचा परिचय दिल्याचे प्रशसोद्गार ड.आर. बी. अटल यांनी काढले. या कार्यक्रमाचे संचालन राष्ट्रीय सचिव अमोल चवणे यांनी केले तर सचिन पहाडे यांनी आभार मानले.

# पाण्याच्या टाक्यात पडून इसमाचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती–** घरातील पाण्याच्या टाक्यात पडून इसमाचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी रात्री राजापेठ ठाण्यांतर्गत येणाऱ्या चुनाभट्टी परिसरात उघडकीस आली. या घटनेत पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली. पुरुषोत्तम रामरावजी सूर्यवंशी (वय ५१ रा. चुनाभट्टी) असे मृताचे नाव आहे.पुरुषोत्तम सूर्यवंशी हे किराणा दुकानात काम करतात आणि परिवार सांभाळतात. तसेच त्यांना दारुचे व्यसन असल्यामुळे तेनेहमीच दारु पितात. शनिवारी दुकान बंद झाल्यानंतर ते दारूच्या नशेत घरी आले आणि लहान मुलाला पाय दाबून मागितले. त्यावेळी त्यांना खूप घाम येत होता.

त्यामुळे ते आंघोळ करण्याकरिता गेले आणि पाण्याच्या टाक्यातून पाणी घेत असताना ते टाक्यात पडले.ही बाब मुलाला माहित होताच त्यांनी शेजाऱ्यांच्या मदतीने वडिलांना पाण्याच्या टाक्यातून बाहेर काढले आणि जिल्हा सामान्य रुग्णालयात आणले. परंतु डॉक्टरांनी तपासल्यानंतर त्यांना मृत घोषित केले.

# दुकानासमोरून दुचाकी लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती**

इतवारा बाजार परिसरात असलेल्या दुकानासमोर व्यावसायिकाने नेहमीप्रमाणे त्याची दुचाकी (एमएच २७/ एक्यू ६५७०) उभी केली होती. दरम्यान काही वेळाने त्याचे लक्ष गेले असता, दुचाकी जागेवर दिसून आली नाही. शोध घेऊनही ती आढळली नाही. याप्रकरणी शेख रहेमान शेख अमिर (५०) यांनी दिलेल्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# यावली शहीद येथे बीज उगवण क्षमता चाचणीचे प्रात्यक्षिक

## खरीप हंगामसाठी बियाण्याच्या गुणवत्तेवर कृषी विभागाचा विशेष भर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५ नांदगाव पेठ–** खरीप हंगाम २०२५-२६ साठी कृषी विभागाने शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध व्हावीत यासाठी विशेष मोहीम राबविली आहे. या अनुषंगाने यावली शहीद येथे बियाण्याच्या उगवण क्षमतेची चाचणी घेण्यात आली. तालुका कृषी अधिकारी कार्यालय, अमरावती अंतर्गत कार्यरत कृषी सहाय्यक ज्योती ठाकरे यांनी बीज उगवण क्षमता चाचणीचे प्रात्यक्षिक करून महिला शेतकऱ्यांना याबाबत माहिती दिली. अनेक वेळा शेतकरी बियाणे खरेदी करत असतांना त्यांना बियाण्यांच्या गुणवत्तेबाबत माहिती नसते.त्यामुळे अनेकदा निकृष्ट दर्जाचे बियाणे शेतकऱ्यांना मिळते. यानिकृष्ट बियाण्यामुळे उत्पादनात घट येते तसेच दुबार पेरणीचा खर्चही वाढतो. या पार्श्वभूमीवर बीज



उगम क्षमता चाचणीचे महत्त्व अधोरेखित करत ज्योती ठाकरे यांनी शेतकरी महिलांना याबाबत मार्गदर्शन केले आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर केले. बियाण्याच्या उगवण क्षमतेची चाचणी केल्याने चांगल्या बियाण्यांची निवड करता येते व पेरणीपूर्व नियोजन प्रभावीपणे करता येते. त्यामुळे उत्पादनात वाढ होऊन खर्चात बचत होते.कृषी विभागाने उचललेले हे पाऊल निश्चितच शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक आणि दिलासादायक ठरणार आहे. विभागाकडून अशा प्रकारच्या चाचण्यांचे आयोजन करून शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली जात असल्याने भविष्यात शेतकरी वर्ग अनेक आर्थिक आणि मानसिक त्रासापासून मुक्त होईल अशी प्रतिक्रिया यावेळी उपस्थित महिला शेतकऱ्यांनी दिली.

# वडिलांच्या मदतीला धावलेल्या मुलीचा विनयभंग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती** सामान घेवून येणाऱ्या व्यक्तीद्वारे केबलतुटला म्हणून पितापुत्राने त्याला मारहाण केली. त्याच वेळी वडिलांच्या बचावासाठी धावलेल्या मुलीचा मुलाने विनयभंग केला. तू घरी एकटीच राहते, तुला पाहून घेईन अशी धमकी दिली, तर तिच्या आईला लोटालोट केली. वडिलांच्या डोक्यात दगड मारून जखमी केले. ही घटना फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यांतर्गत घडली. याप्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# ३१ वर्षांपासून सावित्रीच्या लेकींची शासनाकडून 'रुपयावर' बोळवण!

## राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील मुलींना दररोज फक्त १ रुपयाच प्रोत्साहन भत्ता

### अमरावती जिल्हा परिषदची सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना बंद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती** अनुसूचित जाती-जमाती व भटक्या-विमुक्त समाजातील पहिली ते चौथीपर्यंत शिकणाऱ्या मुलींसाठी सन १९९२ पासून शासनाकडून 'प्रोत्साहन उपस्थिती भत्ता' देण्यात येतो. मात्र, तब्बल ३१ वर्षानंतरही या योजनेंतर्गत विद्यार्थिनींना दररोज फक्त १ रुपयाच भत्ता मिळतो आहे. महागाईने सर्वच क्षेत्रांमध्ये उच्चांक गाठलेला असताना या भत्त्यात एक पैशाचीही वाढ झालेली नाही.

या योजनेचा उद्देश मुलींच्या शालेय उपस्थितीत वाढ करणे आणि त्यांना शाळेकडे आकर्षित करणे हा आहे. मात्र, महागाईच्या तुलनेत हा भत्ता सध्याच्या काळात अत्यंत अपुरा आणि नाममात्र असल्याचे चित्र आहे.जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थिनींसाठी दिला जाणारा हा भत्ता दारिद्र्यरेषेखालील तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील अनुसूचित जाती-जमाती व भटक्या समाजातील मुलींना लागू होतो.२०२१ मध्ये मंत्रिमंडळाने या भत्त्यात वाढ करून तो पाच रुपये करण्याची शिफारस केली होती. मात्र, चार वर्षांचा कालावधी उलटूनही शासनाकडून कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. शिक्षण विभाग किंवा लोकप्रतिनिधीयांच्याकडूनही या विषयाकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याचे दिसून येते.या भत्त्यात तातडीने वाढ करून विद्यार्थिनींना खऱ्या अर्थाने प्रोत्साहन देण्याची मागणी आता जोर धरूलागली आहे. शासनाने सावित्रीच्या लेकींची ही थट्टा थांबवावी, अशी संतप्त प्रतिक्रिया पालकांतून व्यक्त होत आहे.

### योजना ठरत आहे औपचारिक

या योजनेला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्यात आले असून, त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली होती. त्यांच्याच नावाने सुरू झालेल्या या योजनेच्या माध्यमातून विद्यार्थिनींना केवळ एक रुपया देण्यात येत असल्याने ही योजना केवळ औपचारिक ठरते आहे, अशी टीका पालक आणि शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहे.



### *तोंडाला पाने पुसली!*

मुलींच्या शिक्षणासाठी दिला जाणारा एक रुपयाचा भत्ता म्हणजे केवळ 'तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार' असल्याचे पालकांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे हा एक रुपयादेखील अनेकदा वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत.जि. प. शाळांमधील मुलींची उपस्थिती वाढावी, यासाठी शासन दररोज एक रुपयाप्रमाणे भत्ता देते. परंतु, ३१ वर्षामध्ये सोन्याचे भाव दोन हजार रुपये प्रति तोळ्यावरून एक लाखांवर गेले, तरी मुलींना मात्र १ रुपयाच मिळत आहे. शिक्षक समिती या भत्त्यामध्ये वाढ करण्याची मागणी करत आहे.

**राजेश सावरकर,**

राज्य प्रसिध्दी प्रमुख, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती–

# अमरावती महसूल कर्मचारी कल्याण निधी समितीतर्फे महसूल अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा सत्कार

## जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांची विशेष उपस्थिति

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

इयत्ता दहावी व बारावीनंतर विद्यार्थ्यांकरिता पुढील टप्पा हा महत्त्वाचा असतो. त्याकरिता परिश्रम आवश्यक आहे. स्पर्धा वाढलेली असून कठीण परिश्रम घ्यावे लागेल. दृढनिश्चय केल्यास यश नक्कीच मिळते, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी तथा अमरावती महसूल कर्मचारी कल्याण निधी समितीचे अध्यक्ष सौरभ कटियार यांनी केले.

अमरावती महसूल कर्मचारी कल्याण निधी समितीतर्फे सन २०१९ ते सन २०२४ शैक्षणिक वर्षात इयत्ता दहावी व इयत्ता बारावीमध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या महसूल अधिकारी, कर्मचार्यांच्या पाल्यांचा सत्कार नियोजन भवन येथील सभागृहात जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच पार पडला. तर अतिथी म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, अधीक्षक कटके मंचावर होते.सत्कारांच्या कार्यक्रमातून विद्याथ प्रेरणा मिळते. विद्यार्थ्यांनी इथेच न थांबता या यश संपादन करण्याकरिता सातत्याने अभ्यास आपल्या आई-वडिलांचे नावलौकिक ज्यांचा सत्कार झाला त्यांना भविष्यात सत्कार खूप मोठा झाला, असे वाटेल. यश करण्याकरिता जिद्द मेहनत चिकाटीने करण्याचे आवाहन निवासी उपजिल्हा अनिल भटकर यांनी विद्यार्थ्यांना केले.



### सत्कार सोहळ्यातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते : अनिल भटकर

सत्कारांच्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते. विद्यार्थ्यांनी इथेच न थांबता यापुढेही यश संपादन करण्याकरिता सातत्याने अभ्यास करून आपल्या आई-वडिलांचे नावलौकिक करावे. ज्यांचा सत्कार झाला त्यांना भविष्यात आपला सत्कार खूप मोठा झाला, असे वाटेल. यश संपादन करण्याकरिता जिद्द मेहनत चिकाटीने अभ्यास करण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी विद्यार्थ्यांना केले.

सौरभ कटियार आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, कोविड काळापासून विद्यार्थ्यांचा सत्कार झालेला नाही, तो आता पूर्ववत व्हावा, अशा कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते. इयत्ता बारावीत तिसरा क्रमांक आल्यानंतर माझ्या वडिलांच्या कार्यालयात सत्कार झाला होता, त्या सत्काराची आठवण यानिमित्ताने झाल्याचे कटियार म्हणाले. आम्हाला घडवण्यासाठी आई - वडिलांनी परिश्रम घेतले आहे. मुलांना घडविण्यासाठी आई-वडिलांनाही परिश्रम घ्यावे लागते. आदर्श कर्मचारी व्हा, म्हणजेच तुम्हाला बघून तुमचा पाल्य घडेल व तो तुमची प्रेरणा घेईल, असे यावेळी जिल्हाधिकारी कटीयार म्हणाले.जिल्हाधिकारी कार्यालयाचे शिपाई गोविंद चव्हाण यांचा मुलगा तेजस याचा एमबीबीएसला नंबर लागल्याबद्दल जिल्हाधिकार्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्रदेऊन गोविंद चव्हाण यांचा सन्माने करण्यात आला. तर शिवाजी जाधव यांच्या आयुष्य जगताना या कादंबरीला पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. भक्ती गावंडे, शंतनू आढाव, खुशी गंधे, हर्ष पुरळकर, सोहम गोरडे, योगेंद्र जंगले, सोहम गोरडे, अनिकेत आगरकर, पार्थ भेंडेकर, उमेश सांगळे, मीत वानखडे, शुभम स्वर्गीय, सृष्टी मेश्राम, आदेश चौधरी, निलेश इंगळे, शंतनु शिंदे, प्रेरणा वानखडे, सौरभ अनासाने, शुभम चव्हाण, ईश्वर हरणे, तुषार बनारसे, अमोल धुर्वे, श्रेया वीर, यश भांडे, प्रथमेश भांडे, जानवी वरेकर, अनुष्का बागेकर, इशिका गंधे, अनुज भोपळे, आराध्य अंबाळकर, हर्षल मुंदरके, वैष्णवी अर्डक, सई रोधे, मानसी इंगळे, प्राची थोरवे, प्रतिक्षा देशमुख, रवीना आगरकर, सार्थक नेटवे, केतन भगत, वैदर्भी वानखडे यांच्यासह अन्य महसूल अधिकारी, कर्मचार्यांच्या पाल्याचा सन्मानचिन्ह, सन्मानपत्र पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

# कापूस बियाण्यांच्या विक्रीवर १५ मेपर्यंत निर्बंध

## कारवाईबाबत विक्रेत्यांना कृषी विभागाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती**

बी. टी. कापसाच्या बियाण्यांची विक्री १५ मे नंतरच करण्याच्या सूचना कृषी विभागाने विक्रेत्यांना दिल्या आहेत. यापूर्वी बियाण्यांची विक्री केल्यास संबंधित विक्रेत्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा कृषी विभागाने दिला आहे. शेतकर्यांनीही १ जूननंतरच पेरणी करावी. असा सल्ला दिला आहे.



कोरडवाहू पट्ट्यात कापूस हे मुख्य पीक आहे. एकूण पेरणीक्षेत्राच्या तुलनेत सर्वाधिक पेरणी कापसाची केली जाते. शेतीच्या आंतरमशागतीस प्रारंभ झाला असून शेतकरी आगामी हंगामाच्या तयारीस लागला आहे. यंदाच्या हंगामात कापसाखाली अमरावती जिल्ह्यातील २ लाख ४९हजार हेक्टर क्षेत्र पेरणीखाली राहण्याची अपेक्षा आहे. त्यासाठी ६ हजार क्विंटल बियाणे लागण्याचा अंदाज कृषी विभागाने वर्तविला असून नियोजन केले आहे. जिल्ह्यातील काही भागात धूळपेरणी करण्यात येते. यावर्षी १५ मे पर्यंत कापसाच्या बियाण्यांच्या विक्रीवर प्रतिबंध लावण्यात आले आहेत. विक्रेत्यानी शेतकर्यांना १५ मे पूर्वी बियाणे विक्री करू नये, असे आदेश कृषी विभागाने दिले आहेत. सन २०१७ मध्ये खरीप हंगामात कापसावर शेंदरी बोंडअळीचा प्रादुर्भाव मोठ्याप्रमाणावर झाला होता. त्यानंतर कृषी विभागाने २०१८ ते २०१४ या कालावधीत राबविलेल्या उपाययोजनांमुळे शेंदरी बोंडअळीचा प्रादुर्भाव कमी झाला. आगामी हंगामातही शेंदरी बोंडअळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. हंगाम पूर्व कापूस लागवड झाल्यास शेंदरी बोडअळीच्या जीवनक्रमास पोषक वातावरण निर्माण होऊन प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता अधिक आहे ही बाब लक्षात घेता खरीप २०२५ मध्ये शेंदरी बोडअळीच्या प्रादुर्भावास आळा घालण्याकरिता व या अळीचा जीवनक्रम खंडित होण्यासाठी अनेक उपाययोजनांपैकी एक म्हणजे हंगामपूर्व लागवड टाळणे हा आहे. त्यासाठीच कृषी विभानाने शेतकर्यांना १ जूननंतर लागवडीचा सल्ला दिला आहे. पेरणी नाही, यासाठी बियाणे हंगामापूर्वी उप होणार नाही, याची दक्षता घेण्यात आहे. त्यामुळेच विक्रेत्यांना १५ मे विक्री करण्यास मनाई आदेश बजावन्यात आला आहे. या मुदतीपूर्वी विक्री झाली संबंधित कंपनी, वितरक व किरक विक्रेत्यांविरुद्ध महाराष्ट्र कापूस बियाने अधिनियम अन्वये कारवाई करण्यचा इशारा दिला आहे. बियाणे पुरवठा व विक्री वेळापत्रक कृषी विभागाने जाहीर केले आहे.

# टंचाईमुळे प्राधान्य गट रेशनकार्ड धारकांच्या गव्हामध्ये केली कपात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

राज्यात यंदा गव्हाची टंचाई असल्याने याचा फटका प्राधान्य गटातील रेशनकार्ड धारकांना बसला आहे.या गटातील कार्डधारकांना दोन किलो ऐवजी प्रति व्यक्ती एकच किलो गहू मिळत आहे. त्या ऐवजी तांदळाच्या पुरवठ्यात वाढ केली आहे. त्यामुळे या गटातील कार्डधारकांना १ किलो गहू आणि ४ तांदूळ वितरित केला जात आहे. डिसेंबरपर्यंत हा पुरवठा कायम राहणार असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांनी सांगितले आहे.

जिल्ह्यात अंत्योदय गटातील १ लाख २८ हजार २०७ कार्डधारक व ४ लाख ७८ हजार ५४८ लाभार्थी आहेत, तर प्राधान्य गटातील ३ लाख ७४ हजार ३३५ कार्ड असून, १५ लाख १२हजार १३० लाभार्थी आहेत. या सर्वांना शासनाच्या स्वस्त धान्य दुकानातून अल्प दरात धान्य उपलब्ध करून दिले जाते. यामध्ये अंत्योदय धारकांना २० किलो तांदूळ आणि १५ किलो गहू असे ३५ किलो धान्य दिले जाते, तर प्राधान्य गटाला फेब्रुवारीपर्यंत २ किलो गहू आणि ३ किलो तांदूळ असे ५ किलो धान्य दिले जात होते; मात्र मार्चपासून प्राधान्य गटाकरिता गव्हामध्ये कपात करण्यात आली आहे.राज्यात गव्हाची उपलब्धता नसल्याने हा निर्णय शासनाकडून घेण्यात आला आहे. त्यामुळे दोन महिन्यांपासून प्राधान्य गटातील ३ लाख ७४ हजार ३३५ कार्डधारकांना प्रतिव्यक्ती १ किलो गहू आणि ४ किलो तांदळाचे वाटप केले जात आहे. डिसेंबरपर्यंत अशाच प्रकारचे वाटप प्राधान्य गटातील कार्ड धारकांना होणार आहे; परंतु तांदळाऐवजी गव्हाच्या पुरवठ्यात वाढ करण्याची मागणी रेशनकार्ड धारकांकडून होत आहे.

# तालुकाध्यक्षांना हुसकावून लावल्याचा व्हिडीओ व्हायरल

## उपोषणकर्ते व तालुका भाजप अध्यक्षात उपोषण मंडपातच वादाची ठिणगी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५जसापूर**

शिरजगाव बंड अंतर्गत अवैधअतिक्रमण हटविण्यासाठी गावकऱ्यांनी ग्रामपंचायतकडे तक्रार केल्यानंतरही ग्रामपंचायत प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याने गावकऱ्यांना महाराष्ट्र दिनापासून उपोषणाचा मार्ग अवलंबवावा लागला. उपोषण मंडपाला आ. प्रवीण तायडेसह माजी तालुकाध्यक्ष मुरली माकोडे, गोपाल तिरमारे आदी पदाधिकाऱ्यांनी भेटी देऊन आश्वासनाचे नारळ तेवढे दिलेः मात्र कारवाई झाली नाही. अशातच भाजपचे नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष रमेश तायवाडे यांनीही उपोषण मंडपाला भेट देऊन उपोषणकर्त्याशी चर्चा केली. चर्चेदरम्यान 'भाजपचे सरकार असतांना भाजपच्या



कार्यकर्त्यासह गावकऱ्यावर उपोषण करण्याची पाळी यावी यावर उपोषणकर्त्यांनी चिंता व्यक्त केली. या दरम्यान उपोषणकर्ते व भाजपाध्यक्षात शाब्दिक बाचाबाची झाली. यादरम्यान उपोषणकर्ते व भाजपाध्यक्ष हमरीतुमरीवर आले. यात तेथील उपस्थितांनी भाजपाध्यक्षाला मंडपातून बाहेर नेले. या घटनेचा व्हिडीओ समाजमाध्यमावर व्हायरल झाल्यामुळे हा चर्चेचा विषय ठरला आहे.

चांदूरबाजार तालुक्यातील शिरजगाव बंड येथील श्री संत मारोती महाराज व गाडगे महाराज मंदिराच्या मागील भागात करण्यात आलेले अतिक्रमण तक्रारीनंतरही कायम आहे. त्यामुळे संतापलेल्या गावकऱ्यांनी महाराष्ट्र दिनी १ मेपासून येथील पंचायतसमितीसमोर बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे.उपोषणकर्त्याच्या तक्रारीनुसार अतिक्रमितजागेत बांधकामसुध्दा करण्यात आले आहे. या अतिक्रमणामुळे दोन्ही मंदिरात होणारे कार्यक्रम करताना मोठी अडचण निर्माण होत आहे. याबाबत ग्रामपंचायतकडे कागदपत्रांची पूर्तता करून रीतसर तक्रार करण्यात आली; मात्र ग्रा.पं. प्रशासनाने अद्यापपर्यंत अतिक्रमणाची नोटीससुध्दा दिलेली नाही. वारंवार पाठपुरावा करूनही कारवाई होत नसल्याने अखेर त्रासलेल्या गावकऱ्यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले असून उपोषण सुरू केले आहे. लक्ष्मण महादेव दाभणे, मनोहर पुंडलिकराव निंभोरकर, राजेश देविदास कडू, बाबुराव शंकरराव रावणकर, नितिन वासुदेवराव मेहरे, अनिल रामदास डेहा, प्रभाकर पूर्णाजी रावळे, विनोद रामरावजी पागरुल, पवन साहेबराव भेले, बाबुराव शेषरावजी गुबरे, निर्भय केदारसिंग रघुवंशी यांचा उपोषणकर्त्यात सहभाग आहे.

# 'सुपर' मध्ये मूत्रपिंड विकाराच्या ३ हजारांवर शस्त्रक्रिया यशस्वी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

अमरावती विभागीय सदभ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) येथे विविध गंभीर आजारावरील शस्त्रक्रिया होत आहेत. यामध्ये २०२४-२५ या एक वर्षाच्या कालावधीमध्ये मूत्रपिंड विकाराच्या एकूण ३ हजार २६६ शस्त्रक्रिया करण्यात आत्या आहेत, रुग्णालयातील मूत्रपिंड विकार विभागातील वर्षभरातील ओपीडी ही २९ हजार ४२२ रुग्णाची राहिली आहे

यामध्ये २० हजार ७५२ पुरुष, तर ८ हजार ६७० महिला रुग्ण असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे. स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय हे अमरावती विभागातील नागरिकांसाठी वरदान ठरत आहे. या ठिकाणी मूत्रपिंड प्रत्यारोपण, कर्करोग शस्त्रक्रिया, प्लास्टिक सर्जरी, तर लहान बाळांवरील विविध शस्त्रक्रिया, हृदयविकार शस्त्रक्रिया मोफत होत आहेत. याठिकाणी मूत्रपिंड विकार ज्यामध्ये मूत्र पिंडातील खडे, मूत्राशयाचा कर्करोग,मूत्रमार्गाचा संसर्ग, लघवीचे प्रमाण कमी किंवा जास्त होणे. मूत्रपिंड निकामी होणे अशा आजारावरील उपचार होत आहेत.मूत्रपिंड रक्तातील कचरा आणि अतिरिक्त पाणी फिल्टर करतात, तसेच रक्तातील इलेक्ट्रोलाइट्स आणि ॲसिड-बेसची पातळी ठेवण्याचे संतुलित काम करते. 'सुपर मध्ये वर्षभरात मूत्रपिंड विकाराच्या तब्बल २९ हजार ४२२ रुग्णांची तपासणी करण्यात आली. यामध्ये १७हजार ५४९ रुग्ण हे रुग्णालयात भरती होते, तर त्यातील ३ हजार २६६ रुग्णांवर शस्त्रक्रिया करावी लागल्याची माहिती रुग्णालयाने दिली. विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) येथे विविध गंभीर आजारावरील शस्त्रक्रिया होत आहेत.सुपर मध्ये झालेल्या मूत्रपिंड विकाराच्या एकूण ३२६६ शस्त्रक्रियेमध्ये ५६६ शस्त्रक्रिया या सुझे मेजर आहेत. १३८० या मेजर, तर १३५० या मायनर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे.

# जिल्हा बँकेला ७५० कोटींच्या कर्जवाटपाचे उद्दिष्टलीड बँकेकडून खरिपाचे नियोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

मे महिना सुरू झाल्याने आता शेतकऱ्यांना खरिपाचे वेध लागले आहे. प्रशासनाकडूनदेखील खरिपाची तयारी सुरू असताना जिल्हातील २ लाख २५ हजार शेतकऱ्यांना १६५० कोटीच्या कर्जवाटपाचे लक्षांक २१ बँकांना देण्यात आले आहे. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती बँकेला सर्वाधिक ७५० कोटीचे लक्षांक देण्यात आले आहे. जिल्ह्यात दरवर्षी ७ जूननंतर मान्सूनचे आगमन होत असल्याने १५ जूननंतर पेरणीला सुरुवात केली जाते. त्यामुळे खरीपपूर्व नियोजनाला आता वेग आला आहे. शेतकऱ्यांकडून आतापासून शेती मशागतीचे कामे सुरू झाली आहे. तर प्रशासनाकडून बी - बियाणे, खतांचा पुरवठा याशिवाय तालुकास्तरावर खरीपपूर्व आढावा बैठकीदेखील सुरू आहेत. अशातच सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे शेतकऱ्यांचे आर्थिक बजेट असून त्यांना लागवडीकरिता



पिककर्जाच्या भरोशावर राहावे लागते. त्यामुळे प्रशासनाकडून देखील यंदा खरीपाच्या पीककर्ज वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यात ११ राष्ट्रीयीकृत, ७ खासगी आणि दोन जिल्हास्तरीय बँका आहेत. या बँकाकडून शेतकऱ्यांना कर्जवाटपाचे नियोजन केले जाते. यंदा २ लाख २५ हजार शेतकऱ्यांना १६५० कोटीच्या कर्ज वाटपाचे नियोजन या बँकांना देण्यात आले आहे. १५ एप्रिलपासूनच कर्जवाटपाला बँकाकडून हिरवी झेंडी देण्यात आली आहे. त्यामुळे सदर बँकाकडून कर्जवाटपाकरिता कागदपत्रांची पूर्तता करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

### रब्बीत ४५० कोटींच्या कर्जवाटपाचे लक्ष्यांक

खरिपासोबतच रब्बी हंगामातील उद्दिष्टेदेखील आतापासून देण्यात आले आहे. रब्बीत ४८ हजार ३०० शेतकरी कर्जवाटपाकरिता पात्र करण्यात आले असून त्यांना ४५० कोटींचे कर्जवाटप केले जाणार आहे. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती बँकेला मात्र रब्बीचे उद्दिष्ट दिले जात नाही.

# आमझरी आता होणार मधाचे गाव! ५४ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५चिखलदरा**

राज्यातील विविध जिल्ह्यात मधाचे गाव योजना राबवण्यासाठी अंदाजपत्रक रकमेस मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील आमझरी हे मधाचे गाव याकरिता ५४ लक्ष रुपये मंजूर करण्यात आले आहे.

मागील शिंदे सरकारच्या अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेली मधाची गाव ही योजना राबवीत असताना राज्यातील दहा गावांना देवेंद्र फडणवीस सरकारने विदर्भाचे नंदनवन चिखलदरा तालुक्यातील आमझरी पर्यटन संकुल गावाला मधाचे गाव म्हणून विकसित करण्यासाठी ३० एप्रिल रोजी उद्योग ऊर्जा कामगार मंत्रालयाने काढलेल्या शासन निर्णयामध्ये आमझरी या गावासाठी ५४ लक्ष




रुपये मंजूर करण्यात आले आहे.सदरील गावात मधाचे गाव म्हणून दर्जा मिळावा, यासाठी खादी व ग्रामोद्योग आयोग मधाचे स्फूर्ती क्लस्टर संचालक सुनील भालेराव सतत पाठपुरावा करीत होते. पाठपुराव्यादरम्यान खादी ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष रवींद्र साठे यांनी तसेच मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अंशु सिन्हा यांनी भेट देऊन निसर्गसंपन्न असलेल्या आमझरी गावाला 'मधाचे गाव' हा दर्जा मिळावा म्हणून जिल्हाग्रामोद्योग अधिकारी यांच्याद्वारे जिल्हाधिकारी सौरभकटियार यांनीसुद्धा प्रस्ताव पाठविला होता.स्थानिकांची सतत मागणी पाहता आ. केवलराम काळे यांनी निवडून येताच पाठपुरावा सुरू केला होता.या प्रस्तावास नुकत्याच निघालेल्या निधी मंजुरीच्या शासन निर्णयामुळे १०० टक्के आदिवासी बहुल असलेल्या आमझरी गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. पर्यटकांच्या साहशी खेळांसाठी नावारूपास येत असलेल्या आमझरी गावात मधाचे गावचा दर्जा मिळाल्याने मेळघाटच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवल्या गेला आहे.

# मोर्शीत तलाठ्याच्या घरातून १४ लाखांचे दागिने लंपास

## चोरट्यांनी घर बंद असल्याची संधी साधली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मोर्शी**

चोरट्याने शनिवारी मध्यरात्रीनंतर दोन ते तीन वाजताच्या दरम्यान शहरातील एका बंद घरामध्ये शिरून अंदाजे १४ लाखांचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. ही घटना मोर्शी शहरात शनिवारी रात्री घडली. सिंभोरा मार्गावर असलेल्या शंकरनगरजवळील व्यास ले-आउट येथे राजेश बाबुराव संतापे (४९) यांच्या घरी ही चोरी झाली असून, ते मोशी तहसीलमध्ये तलाठी



म्हणून कार्यरत आहे. शनिवारी ते कुटुंबीयासोबत काही कामानिमित्त अमरावती येथे गेले होते. रात्री अमरावतीहून परत आल्यानंतर जुन्या वस्तीमध्ये असलेल्या त्यांच्या आईकडेच त्यांनी मुक्काम केला.सकाळी शंकरनगर येथील घरी जाऊन पाहिले असता, मुख्य दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसले. त्यामुळे घरात जाऊन पाहिले असता, बेडरूममधील कपाटही तुटलेल्या अवस्थेत व इतर साहित्य अस्ताव्यस्त केले असल्याचे दिसून आले. कपाटातील सोन्याच्या बांगड्या, पोथ, ३ अंगठया, नेकलेस, दोन गोफ, लॉकट, नथ असे एकूण १४३ ग्रॅम सोने तसेच चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरी गेले होते. याबाबत त्यांनी मोर्शी पोलीस स्टेशनला माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी व ठसे तज्ज्ञांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

## ऑल इंडिया फेडरेशन कप कबड्डी स्पर्धा

# पुरुष गटात रेल्वे तर महिला गटात हिमाचल प्रदेशला विजेतेपद



विदर्भ ॲमॅचूअर कबड्डीअसोसिएशन, अमरावती जिल्हा कबट्टी असोसिएशन व शोध प्रतिष्ठान अमरावतीच्या वतीने आयोजित चवथ्या ऑल इंडिया फेडरेशन कप पुरुष / महिला कबड्डी स्पर्धेत पुरुष गटात बलादध इंडियन रेल्वे संघाने राजस्थानचा ४२ – १८ असा पराभव करीत विजेते पद पटकाविले. तर महिला गटात झालेल्या अतिशय चुरशीच्या सामन्यात हिमाचल प्रदेशने ३३–२५ अशा गुण फरकाने इंडियन रेल्वे संघाला पराभूत करून विजेतेपदावर आपले नाव कोरले.

या स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा मोठ्या जल्लोषात व हजारो कबड्डीप्रेमींच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी आमदार सुलभाताई खोडके, यश खोडके, कबड्डी फेडरेशनचे राष्ट्रीय सचिव जितू ठाकूर व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेतील विजेते व उपविजेत्या संघांना आकर्षक ट्राफी प्रदान करण्यात आली. यावेळी मैदानावर नेत्रदीपक आतषबाजी करण्यात आली.

# विदर्भासह राज्यात पुढील चार ते पाच दिवस मेघगर्जनेसह गारपिटीची शक्यता




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

राज्यात ठिकठिकाणी कमाल तापमानाचा पारा ४० अंशांवर पार गेला असतानाच पुढील चार ते पाच दिवस राज्यात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून, काही ठिकाणी गारपिटीची शक्यता आहे. तर मुंबईतही ६ आणि ७ मे रोजी पावसाची शक्यता आहे. ५ ते ७ मे दरम्यान नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव अवकाळीच्या तीव्रतेबरोबर गारपिटीची शक्यता आहे.

अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूरमध्ये ६ व ७ मे, मराठवाड्यात ७ मे, विदर्भात ५ मे रोजी अवकाळीबरोबर गारपिटीची शक्यता आहे तर दुसरीकडे कोकण ३४ ते ३५ डिग्री व विदर्भात ४२ ते ४४ डिग्री तापमान नोंदविले जात आहे.राज्यात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत चालला असतानाच, रविवारी वाशिमने सर्वाधिक तापमानाची नोंद केली. वाशिममध्ये कमाल तापमान ४२.८ अंश सेल्सिअस इतके होते. त्यानंतर नाशिक जिल्ह्यातील मालेगावमध्ये ४२.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

राज्यातील तापमानात प्रचंड वाढ झाली आहे. उष्णतेच्या झळांनी विविध जिल्ह्यांत नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. घराबाहेर पडताना धडकी भरेल एवढे तापमान राज्यभरात नोंदवले जात आहे. त्यामुळे जनजीवनावर परिणाम दिसून येत आहेत.

# ठसकेबाज लावण्या, दिलखेचक अदांनी जिंकली रसिकांची मने शेकडो स्पर्धकांचा सहभाग

## धनश्री प्रतिष्ठान आयोजित आंतरराष्ट्रीय लावणी स्पर्धा यशस्वीरित्या संपन्न : पुढील वर्षी तीन दिवसीय लावणी महोत्सवाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

धनश्री सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठान द्वारा आंतरराष्ट्रीय लोकधारा लावणी नृत्य स्पर्धा यशस्वी संपन्न झाली. उत्कृष्ट नृत्यासाठी स्पर्धकांना बक्षिसे देण्यात आली.



महाराष्ट्राची लोकधारा म्हणून लावणी ओळखली जाते. ही लोककला रुजावी व वाढावी यासाठी धनश्री प्रतिष्ठान वतीने मागील चार वर्षा पासून महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधुन लावणी नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ३ मे रोजी सायंकाळी ७ वाजता नागपूर रोडवरील जिजाऊ प्रतिष्ठान, मराठा नगरी, रहाटगांव येथे आयोजित या कार्यक्रमाला रसिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. स्पर्धेचे उद्धाटन अश्विन चौधरी अध्यक्ष जिजाऊ प्रतिष्ठान यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून प्रा.स्मिता देशमुख प्राचार्य विमलाबाई देशमुख महाविद्यालय तर विशेष अतिथी म्हणून जिजाऊ ब्रिगेडच्या आंतरराष्ट्रीय संघटक मयुराताई देशमुख, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र आडे, शोभना देशमुख,चंद्रकांत पोपट,निशी चौबे,तर सत्कारमूर्ती म्हणून प्रकाश राऊत,सतीश यादव, अर्चना सवाई यांची उपस्थिती होती . एकूण स्पर्धेत ठसकेबाज लावण्या आणि दिलखेचक अदांनी रसिकांची मने जिंकली. यामध्ये वयोगट ५ ते १४ मधील स्पर्धकांपैकी प्रथम बक्षीस अनुक्रमे संयुक्ता ढवळे, स्वरा वैरागडे, द्वितीय अनुक्रमे विधिषा खोयांडे, समन्विता ठाकरे,, तृतीय अनुक्रमे लावण्या आगलावे ,योगण्या वासेकर आणि प्रोत्साहनपर परिणीती मांडले, नूतन गावंडे,ईश्वरी आखरे,श्रावणी मुळे,रीतिषा चौधरी, कर्तव्या धानोरकर, आराध्या डुंबरे, अद्विका राऊत,साची भुसारे यांना मिळाले. १५ ते २५ वर्षे वयोगटातून प्रथम बक्षीस जास्मिन शेख, द्वितीय अनुक्रमे वैष्णवी साखरकर, उर्वशी पलंडू कर,,तृतीय अनुक्रमे श्रेया मोटघरे, भैरवी भोय, यांना, तर ग्रुप खुला गट मध्ये प्रथम गुरुकुल डान्स अकॅडमी वणी, द्वितीय पुरस्कार ब्लॉसम डान्स अकॅडमी नागपूर, तृतीय अनुक्रमे नटराज नृत्यपुरुष साधना केंद्र यवतमाळ, पिडीये ग्रुप वर्धा तसेच खुला गट मध्ये प्रथम आकाश तायडे , द्वितीय जय कैथवास ,तृतीय अनुक्रमे पार्थ कोहळे, हर्षद खान यांना पुरस्कार देऊन गौरविण्यातआले महाराष्ट्रातील नांदेड, चंद्रपूर, छ.संभाजी नगर ,अकोला, यवतमाळ, वाशिम, नागपूरसह विविध जिल्ह्यातून स्पर्धकांनी स्पर्धेत सहभागी होऊन रसिक प्रेक्षकांनी स्पर्धेतील लावणी नृत्यांना भरभरून प्रतिसाद दिला. स्टेजवरील बहारदार लावणीने वातावरण अधिकच रमणीय झाले होते. परीक्षक म्हणून आकाश बिजवे,श्यामली पांडे, अंबू सेदानी उपस्थित होते. याप्रसंगी मराठा उद्योजग क क्षाचे अनिल टाले,कांचन उल्हे,मराठा सेवा संघाचे मनोहर कडू,प्रफुल गुडधे, संभाजी ब्रिगेडचे चे मनीष पाटील, विविध संघटनेतील पदाधिकारी कार्यकर्ते यांची उपस्थिती लाभली भविष्यात तीन दिवसीय लावणी महोत्सव आयोजित करण्याचे जाहीर केले. लावणी स्पर्धेचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदिका क्षिप्रा मानकर यांनी केले.तर प्रास्ताविक धनश्री प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्षा स्पर्धेच्या आयोजक मंजु ठाकरे, यांनी केले.

# अमरावती विभागाचा बारावीचा निकाल ९१.४३ टक्के

## वाशीम जिल्ह्याने पटकावले अव्वल स्थान तर अकोला सर्वात ढांग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेचा म्हणजेच इयत्ता बारावीचा अमरावती विभागाचा निकाल ९१.४३ टक्के लागला असून उत्तीर्णतेच्या टक्केवारीत नऊ विभागीय मंडळांमध्ये अमरावती विभाग पाचव्या स्थानी आहे. गेल्या वर्षी अमरावती विभागाचा निकाल ९३.०० टक्के लागला होता, यंदा त्यात १.५७ टक्क्यांची घसरण झाली असली, तरी क्रमवारीत सहाव्या क्रमांकावरून पाचव्या स्थानी सुधारणा झाली आहे.

निकालाच्या टक्केवारीत विभागात गेल्यावर्षी प्रमाणे यंदाही वाशीम जिल्ह्याने अव्वल स्थान मिळवले असून या जिल्ह्याचा निकाल ९५.६६ टक्के, बुलढाणा ९५.१८, अमरावती ९१.०५, यवतमाळ ९०.६३ तर अकोला जिल्ह्याचा निकाल सर्वात कमी ८४.२८ टक्के लागला आहे.

मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेसाठी अमरावती विभागातून एकूण १ लाख ४६ हजार १४८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. प्रत्यक्षात १ लाख ४५ हजार २५७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. एकूण १ लाख ३२ हजार ८१४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्णतेची टक्केवारी ९१.४३ इतकी आहे.




**अमरावती विभागाचा जिल्हानिहाय निकाल**

वाशीम : ९५.६६ टक्के
बुलढाणा : ९५.१८ टक्के
अमरावती ९१.०५ टक्के
यवतमाळ : ९०.६३ टक्के
अकोला : ८४.२८
एकूण : ९१.४३ टक्के

**शाखानिहाय निकाल**

विज्ञान : ९७.६९ टक्के
वाणिज्य : ९२.०४ टक्के
कला : ८२.८८ टक्के
व्यवसाय अभ्यासक्रम : ७५.८८ टक्के
तंत्रज्ञान–विज्ञान : ९१.९५ टक्के

अमरावती विभागाचा विज्ञान शाखेचा निकाल ९७.६९ टक्के, कला शाखेचा ८२.८८ टक्के, वाणिज्य शाखेचा ९२.०४ टक्के तर व्यवसाय अभ्यासक्रमाचा निकाल ७५.८८ टक्के तर तंत्रज्ञान–विज्ञान शाखेचा निकाल ९१.९५ टक्के इतका लागला आहे.उत्तीर्णतेच्या बाबतीत यंदा देखील मुलींनीच बाजी मारली आहे. अमरावती विभागातून एकूण ६७ हजार १८८ मुलींनी परीक्षा दिली, त्यापैकी ६३ हजार ३५२ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या. हे प्रमाण ९४.२९ टक्के आहे, तर ७८ हजार ६९ मुलांनी परीक्षा दिली, त्यापैकी ६९ हजार ४६२ मुले उत्तीर्ण झाले. मुलांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ही ८८.९७ इतकी आहे.

**गुणपडताळणीची सोय**

विद्यार्थ्यास गुणपडताळणी आणि उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळवरून स्वत: किंवा कनिष्ठ महाविद्यालयामार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. गुणपडताळणीसाठी आणि उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी ६ मे ते २० मे २०२५ पर्यंत अर्ज ऑनलाईन पद्धतीने करता येणार आहे.

# राज्यातील सात हजार गावांमध्ये बीजोत्पादन

## कृषी संजीवनी प्रकल्प व महाबीजमध्ये सामंजस्य करार : राज्यातील २१ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना होणार मोठा लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

राज्याच्या २१ जिल्ह्यातील सुमारे सात हजार गावांमध्ये बीजोत्पादनाला प्रोत्साहन दिले जाणार आहे. त्यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प व महाबीज करण्यात आला. या महत्त्वपूर्ण करारामुळे विदर्भातील आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांसह राज्यातील २१ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा लाभ होईल.



सन २०२५ पासून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या टप्पा–२ अंतर्गत राज्यातील २१ जिल्ह्यांमधील एकूण सहा हजार ९५९ गावांमध्ये विविध कृषि विकास कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. टप्पा–१ प्रमाणेच या टप्प्यातही हवामानानुकूल पीक वाणांचे बीजोत्पादन, जमिनीच्या सुपिकतेसाठी उपाययोजना, फळबाग व बांबू लागवड, तसेच जिवाणू खतांची निर्मिती यासारख्या घटकांचा समावेश असणार आहे. यामुळे बीजोत्पादन क्षेत्राचा विकास होण्यास, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास व जमिनीच्या आरोग्यात सुधारणा होण्यास निश्चित मदत होणार आहे.

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे प्रकल्प संचालक परिमल सिंह आणि महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक योगेश कुंभेजकर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी टप्पा–२ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा झाली.

या सामंजस्य करारामुळे २१ जिल्ह्यांतील महाबीज बीजोत्पादक शेतकऱ्यांना स्त्रोत बियाणे किंमत आणि बीज प्रमाणीकरण नोंदणी शुल्क परताव्याच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य मिळणार आहे. तसेच महाबीजमार्फत उत्पादित गुणवत्तापूर्ण जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा आणि जैविक खतांचा संघ महाजैविक या उत्पादनांचा शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर पुरवठा करण्यात येणार आहे. प्रकल्पातील समाविष्ट जिल्ह्यांमध्ये गळीतधान्ये व पौष्टिक तृणधान्ये लागवडीसाठी शेतकऱ्यांना 'मिनी कीट्स' उपलब्ध करून दिले जातील. तसेच जैविक बुरशीनाशक व खते तयार करण्यासाठी प्रविण प्रशिक्षक यांना महाबीजमार्फत विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तालुका बीज गुणन केंद्रांवर बीजोत्पादन कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी स्त्रोत बियाणे दर व बीज प्रमाणीकरण शुल्क परतावा दिला जाईल. प्रकल्प गावांमध्ये चारा पिकांचे बियाणे तयार करण्यासाठी बीजोत्पादनास प्रोत्साहन दिले जाईल.

